# We Reflect Our-selves

CLARIANT

Clariant
नीतिमत्ता संहिता

what is precious to you?

# We Reflect Our-selves

**Clariant** मध्ये आमचे निर्णय आणि कृती यांचा प्रभाव पडतो हे आम्हाला माहीत आहे. आम्ही अन्य लोक, आमचे पर्यावरण आणि आमच्या सभोवतालच्या समाजाला विचारात घेतो. आम्ही जे काही करतो ते योग्य मार्गाने केले आहे याची खात्री करण्यासाठी आम्ही आमच्या वर्तणुकीचे मनन करतो, अवलोकन करतो.

# अध्यक्षांकडून संदेश

प्रिय सहकाऱ्यांनो,

वैशिष्ट्यपूर्ण रसायनांच्या उद्योगांमध्ये अग्रगण्य कंपनी असणे हे आपले ध्येय आहे. ग्राहक, कर्मचारी, समभाग-धारक आणि ज्या समाजामध्ये आपण कार्यरत आहोत अशा आपल्या सर्व भागधारकांसाठी सरासरीपेक्षा अधिकचे मूल्य तयार करून आपण हे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करतो.

Clariant मध्ये, आपले निर्णय आणि कृती यांचा पर्यावरण आणि आपल्या सभोवतालच्या लोकांवर प्रभाव पडतो, हे आपल्याला माहीत आहे. आपण कोण आहोत आणि आपली भूमिका काय आहे याचे प्रतिबिंब आपल्या वर्तणुकीतून दिसते. सातत्याने बदलत असणाऱ्या पर्यावरणामध्ये, आपल्याकडे दृढ मार्गदर्शक तत्त्वे असणे हे विशेष महत्त्वाचे आहे. आपली सहा मूल्ये, आपला ब्रॅण्ड आणि ही नीतिमत्ता संहिता हे सर्व आपली ओळख दर्शवणारे घटक आहेत - जे आपल्याला Clariant म्हणून सशक्त आणि असामान्य बनवतात.

आपली नीतिमत्ता संहिता आपण ज्या प्रकारे वागतो आणि व्यवसाय करतो, त्यासाठीची नीतिमत्ता आणि सच्चेपणा यांची वचनबद्धता शब्दबद्ध करते, अधोरेखित करते. संचालक मंडळातील, कार्यकारी समितीतील, व्यवस्थापनातील आणि सर्व संघटनात्मक एककांमधील आपल्यापैकी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन कामाला लागू होणारी मूल्ये व तत्त्वे समजावून घेणे आणि ती मूल्ये व तत्त्वे जगणे आवश्यक आहे. आपण नियमांचे पालन करतो, आपण सर्वोच्च नीतिमत्ता मानकांना चिकटून आहोत, आपण दिलेली वचने पूर्ण करतो. परंतु धूसर क्षेत्राबद्दल काय? आपल्या नीतिमत्ता संहितेच्या बाहेरील परिस्थिती उद्भवते आणि आपल्याकडे थेट उत्तर नसते, तेव्हा आपण काय करतो? अशा काही परिस्थिती असतात, जिथे नीतिमत्तेच्या कोंडीच्या परिस्थितींना तोंड देत असताना किंवा मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव असताना आपल्याला निर्णय घेण्याची गरज पडते, हे आपण स्वीकारले पाहिजे.

ही नीतिमत्ता संहिता दिशादर्शक आहे, जी आपल्याला सर्व कामे पारदर्शकतेने आणि सच्चेपणाने करण्यास मदत करते. जरी यामध्ये सर्वच उत्तरे नसली, तरी तुम्हाला योग्य निर्णय घेण्यास सक्षम करणारी साधने ही नीतिमत्ता संहिता प्रदान करते. सच्चेपणा 'होय' तपासणी हे एक असे साधन आहे, जे तुम्हाला अशा कोंडीच्या परिस्थितींमध्ये वापरण्यास, तुम्हाला तुमचा चांगला निर्णय वापरण्याची, प्रश्न विचारण्याची किंवा सल्ल्याची गरज असल्यास तो मागण्यास मी तुम्हाला प्रोत्साहित करतो. आपण सर्वच कधी ना कधी नैतिक कोंडीच्या परिस्थितीना तोंड देतो आणि अशा स्थितीत योग्य गोष्ट करणे ही काहीवेळा सर्वाधिक अवघड गोष्ट असते. आणि, तुम्हाला नेहमी उत्तर माहीत नसते, जे ठीक आहे. परंतु जेव्हा तुम्हाला मदत हवी असेल किंवा जेव्हा तुम्हाला काही तरी अयोग्य असल्याचे दिसून येईल, तेव्हा बोलायचे लक्षात ठेवा.

जो कोणी चिंता व्यक्त करेल अथवा सद्भावनेने संभाव्य किंवा प्रत्यक्ष उल्लंघन दाखवून देईल त्याचे ऐकले जाईल, त्यास मदत केली जाईल व त्याचा आदर केला जाईल आणि त्यासाठी त्याच्याविरुद्ध बदला घेतला जाणार नाही, हे सुनिश्चित करण्यास Clariant पूर्णपणे वचनबद्ध आहे. नीतिमत्ता संहिता वाचल्याने आपल्याला फक्त महत्वपूर्ण माहितीच मिळत नाही, तर ते स्वतःचे अवलोकन करण्याचे देखील काम आहे. आपण आज व्यवसाय कसा करत आहोत त्याबद्दल आणि भविष्यात आपण व्यवसाय कोणत्या उद्देशाने करू शकू, हे प्रतिबिंबित करण्याची संधी म्हणून याकडे पाहिले पाहिजे. आपण प्रत्येक संभाव्य परिस्थितीसाठी नियम तयार करू आणि लिहू शकत नाही, परंतु आपल्या नीतिमत्ता संहितेला नैतिकतेचा दिशादर्शक म्हणून वापरण्यास आपण तुम्हाला सक्षम करू शकतो. तुम्ही कुठे अडकलात, तर मदतीसाठी संपर्क करा, कारण जे कार्यस्थळ नीतिमत्तात्मक व्यवसाय करण्यास प्राधान्य देते, ते काम करण्यासाठी सर्वोत्तम स्थान असते.

आपला स्नेहांकित,

Günter von Au,
अध्यक्ष, संचालक मंडळ

# अनुक्रमणिका


04 अध्यक्षांकडून संदेश
08 या
10 नीतिमत्ता संहितेची अंमलबजावणी कशी करावी आमची मूल्ये
12 एकात्मकता– ‘Yes’ - तपासणी
14 आपली जबाबदारी
16 आमची एकात्मकता अखंडता
20 तुमच्यापासून सुरु होते-बोला!
22 बदला घेतला जाण्यापासून संरक्षण
24 आमची मार्गदर्शक तत्त्वे

**26**
**आम्ही एकमेकांना आदराने वागवतो**

28 लोकांची वागणूक
30 छळवणूक
34 समानता आणि भेदभाव विरहीतता
38 कामगारांच्या अधिकारांचा आदर करणे

**42**
**आम्ही उच्च नीतिमत्ता मानके आणि कायदा यांचे पालन करतो**

44 निकोप स्पर्धा
50 लबाडी
54 इनसायडर ट्रेडिंग
58 मनी लाँड्रिंग
60 एम्बारगो आणि व्यापार नियंत्रण तरतुदी

**64**
**आम्ही सुरक्षिततेला प्राधान्य देतो आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत**

66 पर्यावरण
68 आरोग्य आणि सुरक्षितता
72 उत्पादन धुरीणत्व

**74**
**आम्ही भ्रष्टाचाराशी लढण्यास वचनबद्ध आहोत**

76 लाच लुचपत आणि भ्रष्टाचार
82 भेटी आणि मनोरंजन
88 राजकीय कृती

**92**
**आम्हाला आमच्या समाजाबद्दल काळजी आहे आणि आम्ही एक चांगले कॉर्पोरेट नागरिक म्हणून वागतो**

94 मानव हक्कांचा आदर करणे
96 धर्मादाय योगदाने, प्रायोजकत्व आणि कॉर्पोरेट नागरिकत्व कृती
100 स्वारस्याचे संघर्ष

**104**
**आम्ही माहिती काळजीपूर्वक हाताळतो**

106 माहिती सुरक्षितता
110 डेटा गोपनीयता
114 अचूक पुस्तके आणि नोंदी

**118**
**आम्ही जबाबदारीने संप्रेषण करतो, परस्परांशी संवाद साधतो**

120 सामाजिक माध्यमे
126 माध्यम संबंध आणि गुंतवणूकदार संबंध

**130**
**आम्ही आमच्या संसाधनांची काळजी घेतो**

132 व्यावसायिक मालमत्ता
134 इलेक्ट्रॉनिक संसाधने
136 बौद्धिक संपदा

# ही नीतिमत्ता संहिता कशी वापरावी आणि ती कोणाला लागू होते

एका आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या कंपनीचा भाग म्हणून, आपण दररोज जटील आणि सातत्याने मागणी असणाऱ्या पर्यावरणाला सामोरे जात असतो. आपल्या करियरमध्ये काही ठिकाणी आपल्याला आव्हानात्मक परिस्थितीना सामोरे जावे लागते, ज्यामध्ये अवघड निर्णय घेणे आवश्यक असते, जिथे काय करणे योग्य आहे हे तितकेसे स्पष्ट होत नसते. त्याचप्रमाणे, आपल्याला अशा आव्हानात्मक परिस्थितींचा सामना करावा लागू शकतो जिथे काय करणे योग्य आहे हे स्पष्ट होत असते, मात्र तो निर्णय घेणे अवघड असते. आपल्याला सामोरे जावे लागू शकेल अशा प्रत्येक संभाव्य परिस्थितीला ही नीतिमत्ता संहिता सामील करू शकत नसल्याने, काय करावे याची जेव्हा आपल्याला खात्री नसते तेव्हा सल्ला मिळवणे अत्यावश्यक आहे.

Clariant ची नीतिमत्ता संहिता हे एक होकायंत्र अर्थात दिशादर्शक आहे जे योग्य मार्गावर राहण्याच्या आणि तुमच्या व कंपनीच्या सर्वोत्तम हितासाठी काम करण्यासाठी या निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतून मार्गक्रमण करायला तुम्हाला मदत करू शकते.

Clariant ची नीतिमत्ता संहिता हा कोणत्याही लागू असलेल्या कर्मचारी कराराचा किंवा हस्तपुस्तिकेचा अविभाज्य भाग आहे. संभाव्य उल्लंघनांचे अन्वेषण केले जाईल आणि साधार असल्याचे आढळून आल्यास त्याबाबत शिस्त लावण्यात येईल.

या नीतिमत्ता संहितेमध्ये निर्धारित करण्यात आलेली मानके स्थानिक कायद्याद्वारे व्यक्त केलेल्या मानकांपेक्षा उच्च असल्यास, या नीतिमत्ता संहितेमध्ये निर्धारित करण्यात आलेली मानके लागू राहतील. तथापि, अनपेक्षित प्रकरणांमध्ये जिथे स्थानिक कायदे या संहितेमध्ये निर्धारित करण्यात आलेल्या मानकासोबत संघर्ष करतात, तिथे स्थानिक कायदे लागू राहतील. अशा परिस्थितींमध्ये, प्रादेशिक व्यवस्थापक, देश व्यवस्थापक, किंवा संघटनेमधील अन्य संबंधित प्राधिकारी यांच्याकडून मार्गदर्शन प्राप्त करणे अत्यावश्यक आहे.


# अंमलबजावणी आणि बजावणी

**संचालक मंडळाने Clariant नीतिमत्ता संहितेच्या संपूर्ण अंमलबजावणीसाठी उचित ठराव स्विकारणे सर्व Clariant अस्तित्वांच्या कार्यकारी समितीला आणि व्यवस्थापनाला अनिवार्य केलेले आहे. प्रत्येक Clariant कर्मचारी, व्यवस्थापक आणि संचालक मंडळाचा सदस्य या प्रत्येकाला नीतिमत्ता संहिता उपलब्ध आसावी. नीतिमत्ता संहितेचे पालन करण्याची आणि दिसून आलेल्या चिंता व्यक्त करण्याची किंवा दिसून आलेल्या कोणत्याही उल्लंघनाचा अहवाल देण्याची जबाबदारी ही आपल्यापैकी प्रत्येकाची आहे.**

**आम्ही चिंता आणि अहवाल अतिशय गांभिर्याने घेऊ आणि त्यांचे काळजीपूर्वक पुनरावलोकन करू. आमच्या नीतिमत्ता संहितेच्या साधार आढळून आलेल्या उल्लंघनांचा परिणाम सुधारणात्मक उपाययोजनांमध्ये होईल.**

# आपली मूल्ये

**Clariant ची कॉर्पोरेट मूल्ये ही Clariant ला सर्वाधिक महत्वपूर्ण असलेल्या मुख्य विश्वासांना आणि वर्तणुकींना व्यक्त करतात. ती आपल्या व्यवसायामध्ये भागीदार असलेल्या सर्वांना स्पष्ट संदेश पाठवून, आपल्या कृतींना मार्गदर्शन करतात आणि आपल्या सर्वांना एकाच दिशेमध्ये ठेवतात. Clariant च्या नीतिमत्ता संहितेसह एकत्रितपणे, ती आपण Clariant येथे व्यवसाय कसा करावा याचा मार्ग मूलभूतपणे व्याखित करतात आणि त्याला आकार देतात.**




**Clariant ला तिची व्यूहनीती कार्यान्वित करण्यास सक्षम करण्यासाठी आपण सर्वांनी या मूल्यांना जागणे हे अतीशय महत्वाचे आहे.**

# Integrity 'Yes'-Check

प्रत्येक Clariant कर्मचाऱ्याकडून चांगली विवेकबुद्धी वापरली जाणे आणि निर्णयांवर काळजीपूर्वक विचार केला जाणे अपेक्षित आहे.

काहीवेळा, निर्णय सुस्पष्ट नसतात. शंका असेल तेव्हा, Clariant Integrity 'Yes'-Check चा वापर केल्याने तुम्हाला चूक टाळण्यास आणि तुमच्या कृतीला इतरांद्वारे कसे पाहिले जाईल त्यावर अभ्यास करण्यास मदत होईल. तुम्ही खालील सर्व प्रश्नांची उत्तरे 'होय' देऊ शकल्यास, तुम्हाला माहीत होईल की तुम्ही एक योग्य गोष्ट करणार आहात.

## 1

मी प्रामाणिकपणे कृती केल्याचे दिसत आहे का?

## 2

Clariant ही माझी स्वतःची कंपनी असल्यास, मी हाच निर्णय घेईन का?

## 3

माझी वर्तणूक ही Clariant ची मूल्ये आणि नीतिमत्ता संहिता यांच्याशी सुसंगत आहे का?

## 4

माझे कुटुंबीय आणि मित्र यांना माझ्या कृतींचा अभिमान वाटेल का?

## 5

नामांकित वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर माझ्या आचरणाची बातमी आल्यास मला आरामदायी वाटेल का?

जर तुम्हाला Clariant Integrity 'Yes'-Check ला उत्तर देताना खात्री नसल्यास, निर्णय घेण्याचे थांबवणे आणि मार्गदर्शनासाठी विचारणे हे योग्य आहे.

# आपली जबाबदारी

**Clariant च्या लौकिकाला जपणे आणि, त्यासह, आपल्या शाश्वत यशाची खात्री करणे हे आपण सर्वांनी समप्रमाणात योगदान दिल्यानेच सुरु राहील. म्हणून, आपण सर्वकाळ आपल्या नीतिमत्ता संहितेचे पालन करणे ही आपल्यापैकी प्रत्येकाची जबाबदारी आहे.**

**याचाच अर्थ, एक कर्मचारी म्हणून, आपण सर्वजण:**

–

**Clariant ची नीतिमत्ता संहिता वाचू, समजावून घेऊ आणि त्याबद्दल काही स्पष्टता नसल्यास प्रश्न विचारू;**

–

**दिलेल्या कालावधीमध्ये आपल्याला नियुक्त करण्यात आलेले कोणतेही संहितेसंबंधित प्रशिक्षण पूर्ण करु;**

–

**नीतिमत्ता संहितेचे पालन करु आणि कोणत्याही चिंतेचा किंवा संभाव्य उल्लंघनाचा अहवाल देऊ; आणि**

–

**आपल्याला काही शंका असल्यास किंवा परिस्थितीबद्दल खात्री नसल्यास सल्ला मागू.**

याशिवाय, जे व्यवस्थापकीय स्तरावर आहेत त्यांची जबाबदारी विस्तृत आहे. Clariant व्यवस्थापनाकडून अपेक्षित आहे की:

–
या नीतिमत्ता संहितेमध्ये निर्धारित करण्यात आलेल्या मानकांचे पालन करून आणि खुलेपणाने व पारदर्शकपणाने Clariant च्या मूल्यांचे आचरण करून नीतिमत्तापूर्ण नेतृत्वाचे प्रात्यक्षिक सादर करा; आदर्श निर्माण करा;

–
गैरवर्तनाची माहिती मिळताच झाल्यावर बोला - दुसरीकडे पाहू नका;

–
जेव्हा एखादी कृती कायदेशीर आहे की नाही याबद्दल शंका असेल तेव्हा सक्रिय रहा आणि अधिक माहिती घ्या. फक्त वेगवेगळ्या सांस्कृतिक संदर्भामध्ये एखादी गोष्ट वा कृती करण्याची ही पद्धत आहे असे गृहित धरणे ही एक चांगली पद्धत नाही;

–
कार्यसंघाच्या सदस्यांना या आचारसंहिता आणि अपेक्षित वर्तनाबद्दल जाणून घेण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि नियमितपणे चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करा;

–
कार्यसंघाच्या सदस्यांना बोलण्यासाठी, त्यांना ऐकण्यासाठी - आणि मोकळेपणाने अभिप्राय देण्यासाठी व्यासपीठ प्रदान करा;

–
जेथे संघातील सदस्यांना चिंता व्यक्त करण्यास आरामदायी वाटेल अशा पोषक वातावरणाची निर्मिती करा; आणि

–
शक्य तितक्या लवकर संघातील सदस्यांकडून आलेले अहवाल पुढे पाठवा - त्यांचे स्वतंत्रपणे अन्वेषण करु नका.

# सच्चेपणा तुमच्यापासून सुरु होतो – आवाज उठवा !

आपल्या नीतिमत्ता संहितेचे संभाव्यत: उल्लंघन होत आहे असे तुम्हाला वाटते अशी कोणतीही वर्तणूक निदर्शनास आल्यास Clariant तुम्हाला आवाज उठवण्यास प्रोत्साहित करते. परिस्थिती व तुम्हाला वाटत असलेली चिंता मोकळेपणाने सांगण्यासाठी तुम्हाला सोईस्कर वाटत असेल असा तुमचा सुपरवायझर, तुमचा अनुपालन अधिकारी, किंवा मानव संसाधन (HR), विधी किंवा पर्यावरण, सुरक्षितता आणि आरोग्य विषयक बाबी (ESHA) संघ यांमधील कोणाशीही बोलणे हे सर्वोत्तम आहे.

काही वेळा, कोणाशी तरी व्यक्तिश: बोलणे अवघड असते आणि तुम्हाला ओळखले जाईल या भीतीपोटी तुम्हाला बोलणे सोईस्कर वाटू शकणार नाही. Clariant च्या सच्चेपणाची लाईन अर्थात इंटिग्रीटी लाईन हे एक गोपनीय चॅनल आहे जे एक स्वतंत्र त्रयस्थ पक्षाद्वारे चालवले जाते ज्याच्यांमार्फत आपण आपली चिंता व्यक्त करू शकता आणि - तुम्हाला वाटल्यास - ते करताना तुम्ही निनावी राहू शकता. अनुपालन विभागाला सर्व अहवाल प्राप्त होतील व पुढील पुनरावलोकनासाठी आणि, आवश्यकता भासल्यास, अन्वेषणासाठी ते अतिरिक्त विभागांना किंवा पक्षांना गुंतवतील, समाविष्ट करतील.

सर्व अहवाल आणि चिंता या गंभीरपणे घेतल्या जातील आणि अतिशय गोपनीय समजल्या जातील.

तुम्ही या संकेतस्थळाद्वारे किंवा इंट्रानेटद्वारे या इंटिग्रीटी लाईनचा वापर करू शकता: https://integrityline.clariant.com.

या नीतिमत्ता संहितेशी संबंधित प्रश्न किंवा कोणत्याही चिंता या आमच्या अनुपालन अधिकाऱ्यांपैकी एकाला ई-मेल द्वारे देखील पाठवू शकता – complianceofficer@clariant.com
(गैर-निनावी).

# बदला घेतला जाण्यापासून संरक्षण

जो कोणी चिंता किंवा संभाव्य व वास्तविक उल्लंघनाला उजेडात आणेल त्याचे म्हणणे ऐकले जाईल, त्याला सहाय्य केले जाईल व त्याला आदर मिळेल आणि त्यांच्याविरुद्ध कोणताही बदला घेतला जाणार नाही याची खात्री करण्याची जबाबदारी व्यवस्थापन आणि त्यावरील स्तरांवर असणाऱ्यांची आहे. आम्ही स्वत:बाबत अहवाल देणाऱ्यांवर त्यांच्या स्वत:च्या नीतिमत्ता संहितेच्या उल्लंघनांसाठी कारवाई करण्याचा अधिकार राखून ठेवतो. बदला घेणे हे कधीही सहन केले जाणार नाही आणि ते शिस्तभंगाच्या कारवाईच्या अधीन आहे, कारण ते जाणीवपूर्वक केलेले असभ्य आरोप आहेत, असभ्य कृती आहे.

# आमची मार्गदर्शक तत्वे

–
आम्ही एकमेकांना आदराने वागवतो;

–
आम्ही उच्च नीतिमत्ता मानके आणि कायदा यांचे पालन करतो;

–
आम्ही सुरक्षिततेला प्राधान्य देतो आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत;

–
भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत;

–
आम्ही आमच्या समुदायाची काळजी घेतो आणि एक चांगला कॉर्पोरेट नागरिक म्हणून वागतो;

–
आम्ही माहिती काळजीपूर्वक हाताळतो;

–
आम्ही जबाबदारीने संप्रेषण करतो;

–
आम्ही आमच्या संसाधनांची काळजी घेतो.

# आम्ही एकमेकांना आदराने वागवतो

**Clariant मध्ये आम्ही दृढपणे विश्वास ठेवतो की विश्वास, सच्चेपणा, प्रशंसा, आणि आदर आपल्या कंपनीला आणि तिच्या सर्व कर्मचाऱ्यांना अधिक सशक्त बनवते. आम्हाला आमच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी एक प्रोत्साहनात्मक आणि परिपूर्ण करणारे वातावरण तयार करावयाचे आहे, कारण ते सुदृढ आणि टिकून राहणाऱ्या परिणामांकडे घेऊन जाते. आदर हा आम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीचा आणि आमच्या सर्व आंतरक्रियांचा भाग आहे.**

**या विभागामध्ये:**

**–**

**लोकांशी वागणूक**

**–**

**छळवणूक**

**–**

**समानता आणि भेदभाव नाही**

**–**

**कामगारांच्या अधिकारांचा आदर करणे**

# लोकांशी वागणूक

**आदर हा प्रत्येक यशस्वी सहयोगाचा पाया असतो. प्रत्येक कर्मचाऱ्याला कामाची निकोप स्थिती आणि आदरपूर्वक वागणूक मिळण्याचा हक्क आहे. Clariant मध्ये आम्ही, प्रत्येकाला यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली लवचिकता, स्वातंत्र्य, आणि अनुभव पुरवून खुलेपणाची आणि आदराची संस्कृती राखतो.**

**म्हणूनच, आपल्यापैकी प्रत्येक जण आपल्या सहकाऱ्याला, व्यावसायिक भागीदाराला, किंवा आपण ज्याच्यासोबत काम करतो त्या अन्य कोणत्याही व्यक्तीला आदरपूर्वक, खुलेपणाने आणि गुणग्राहक पद्धतीने वागवण्यास कर्तव्य-बद्ध आहे. आम्ही नेहमीच लोकांना त्यांनी आम्हाला स्वत:ला द्यावी अशा वागणूकीची आम्ही अपेक्षा करतो, आणि आम्ही जे काही करतो त्यात उच्च पातळीचा व्यक्तिगत सच्चेपणा राखला जाईल अशा प्रकारे वागणूक देतो.**

## आदर

आदर म्हणजे सहकाऱ्यांशी आणि आपण ज्यांच्याशी सहयोग करतो त्यांच्याशी सर्व स्तरांवर, अधिकारश्रेणींवर आणि भौगोलिकतांवर परस्पर गुणग्राहक आणि पूर्वग्रहमुक्त वर्तणूक.

# छळवणूक

**Clariant कोणत्याही प्रकारच्या छळवणूकीला सहन करत नाही. आम्ही छळवणूकीच्या वर्तणुकीला प्रतिबंध करण्यासाठी सर्व उपाययोजना करू.**

**आपल्यापैकी प्रत्येकजण छळवणूक आणि भेदभाव मुक्त कार्य वातावरणासाठी योगदान देण्यास आणि प्रोत्साहन देण्यास जबाबदार आहे. छळवणूक दर्शवणारी कोणतीही वागणूक निदर्शनास आल्यास आम्ही हस्तक्षेप करतो.**

## छळवणूक

कोणतीही अस्वागतार्ह वर्तणूक जी एक चिथावणीचे, वैरभावाचे, धाकदपटशाचे, किंवा अ-समावेशक कार्य वातावरण तयार करते असे छळवणूकीचे वर्णन केले जाऊ शकते. छळवणूक ही मौखिक शेरेबाजी, शारीरिक लगट, अनुचित मनोरंजन किंवा दृश्य प्रदर्शन यांसहित कोणत्याही स्वरूपात असू शकते, आणि ती सहकारी, सुपरवायझर, कंत्राटदार, ग्राहक, किंवा ज्याची आपल्या कंपनीमध्ये भागिदारी आहे अशा अन्य कोणाकडूनही होऊ शकते.

चिथावणीखोर साहित्य वापरणे किंवा वितरीत करणे, कलंकित, अनुचित टिप्पण्या, किंवा अन्य व्यक्तीच्या खर्चावर विनोद करणारी भाषा वापरणे आदराला धोक्यात आणते आणि हे आपल्या कार्यस्थळासाठी उचित नाही. छळवणूक ही लैंगिक स्वरूपाची असू शकते. यामध्ये अस्वागतार्ह लैंगिक लगट, लैंगिक टिप्पण्या किंवा विनोद, आणि कामावर असताना किंवा कंपनीची संसाधने वापरून पोर्नोग्राफी पाहणे किंवा डाउनलोड करणे किंवा अन्य अनुचित साहित्य पाहणे याचा समावेश होतो.

## बुलिंग/मॉबिंग

बुलिंग वा मॉबिंग हा छळवणूकीचा एक वेगळा प्रकार आहे. पद्धतशीर, सातत्याने किंवा पुन्हा पुन्हा केलेली वैरभावाची वर्तणूक – जी एकतर व्यक्तिशः किंवा ई-मेल, सामाजिक माध्यमे आणि अन्य डिजीटल संवादाचा वापर करून - एखाद्या व्यक्तीचा पाणउतारा करण्यासाठी किंवा त्याला वगळण्यासाठी केली जाते, अशी त्याची व्याख्या केली जाते.



# 1

### शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
माझे नवीन सुपरवायझर हे अतिशय शीघ्र कोपी आहेत असे वाटते. तणावाच्या वेळी, माझे सुपरवायझर माझ्यावर ओरडतात आणि इतरांच्या समोर मला काढून टाकण्याची धमकी देतात. मला भीती वाटते की मी जर परिस्थितीचा अहवाल दिल्यास मला माझी नोकरी गमवावी लागेल. मी शांत बसावे का?

**उत्तर:**
नाही, तुम्ही या बाबतीत HR किंवा अनुपालन विभाग यांमधील कोणा एकाशी बोलले पाहिजे.

# 2

### शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
माझी दुसऱ्या विभागामध्ये बदली करण्यात आली आणि माझा नवीन संघ सहकारी माझ्याबद्दल अनुचित टिप्पण्या करतो. ते कधीही दुपारच्या भोजनासाठी एकत्र जातात, तेव्हा ते मला सोबत येण्याबाबत विचारत नाहीत. मला असे देखील समजले आहे की संपूर्ण संघ त्यांच्या स्मार्टफोनवर समूह चॅटमध्ये सहभागी असतो, मात्र मी त्याचा भाग नाही. मला वगळल्यासारखे आणि पाणउतारा केल्यासारखे वाटते. मी काय करू शकेन?

**उत्तर:**
परिस्थितीने अनुमती दिल्यास, आणि तुम्हाला तसे करणे आरामदायी वाटल्यास, तुमची निरीक्षणे थेट तुमच्या सहकाऱ्याशी किंवा तुमच्या सुपरवायझरशी शेअर करा. अन्य पर्याय म्हणजे, तुमची चिंता HR किंवा अनुपालन विभाग यांना कळवा. ज्या सहकाऱ्यांना अनुचित वर्तणुकीबद्दल जाणीव आहे त्यांनी देखील आवाज उठवला पाहिजे.

# समानता आणि भेदभाव न करणे



**Clariant भेदभाव-विरहीत कार्यस्थळ आणि समान संधी याची खात्री करण्यास वचनबद्ध आहे. आम्ही समावेशक आणि बहुविध वातावरणाला प्रोत्साहन देतो जिथे प्रत्येकाला शिकण्याची आणि प्रशिक्षणाची संधी असते.**

**आम्ही वंश, जातीयता, राष्ट्रीयत्व, धर्म, लिंग किंवा लैंगिक ओळख, विकलांगता, वय, नागरी स्थिती, लैगिंक अभिमुखता किंवा संघटना किंवा राजकीय पक्ष यांचे सदस्यत्व यांवर आधारीत भेदभावाला सहन करणार नाही. भरती, नुकसानभरपाई आणि बढती प्रक्रियेमध्ये, प्रत्येक कर्मचारी आणि अर्जदार यांना त्यांच्या व्यक्तिगत कौशल्ये, क्षमता, कामगिरी आणि सामर्थ्य या आधारावर वागवले जाण्याचा हक्क आहे.**

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी अन्य संघाकडे एक पदासाठी अर्ज केलेला आहे परंतु असे समजले की ते पद माझ्यापेक्षा कमी पात्रता आहे असे वाटत असलेल्या व्यक्तीला देऊ करण्यात आले. माझ्या मते भरती करणाऱ्या व्यवस्थापकाला माझ्या विकलांगतेबद्दल माहिती होते हे कारण होते. मी काय केले पाहिजे?

**उत्तर:**
Clariant मध्ये भरती करण्याचे निर्णय वस्तुनिष्ठ निकषांवर आधारित असतात. तुम्हाला अनुचित पद्धतीने वागवले गेले असा तुम्हाला संशय असल्यास, भरती करण्याच्या निर्णयाला कारणीभूत असलेली कारणे भरती व्यवस्थापकाकडून स्पष्ट करून घेण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला रास्त उत्तर प्राप्त झाले नाही तर, आवाज उठवा आणि HR ला तुमची चिंता कळवा.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी अनेक वर्षापासून कंपनीमध्ये आहे आणि माझी वार्षिक कामगिरी रेटिंग ही नेहमीच किमान पूर्णपणे समाधानकारक अशी असतात. मला आता मागील वर्षाच्या शेवटापासून नवीन सुपरवायझर आहे ज्याने वस्तुस्थितीवर आधारित युक्तिवाद न करता माझ्या कामगिरीला 'सुधारणेची गरज आहे' असे रेट केले आहे. मी याला आव्हान द्यावे का?

**उत्तर:**
Clariant मध्ये कामगिरी पुनरावलोकन प्रक्रिया ही वस्तुस्थिती आणि विधायक अभिप्राय यांवर आधारित असते. सर्व कर्मचारी हे वाजवी कामगिरी पुनरावलोकनाचे हक्कधारक आहेत. तुम्ही स्पष्टता मिळवण्यास तुमच्या सुपरवायझरशी बोलले पाहिजे किंवा अनुचित रेटिंग निकषांच्या प्रकरणामध्ये HR ला आपली चिंता कळवली पाहिजे.

# कामगाराच्या हक्कांचा आदर करणे

Clariant त्यांच्या सर्व ऑपरेशन्समध्ये आणि कृतींमध्ये कायदे, नियमने, आणि नीतिमत्ता मानके यांचे सर्व काळ पालन करण्यास प्रयत्नांची पराकाष्ठा करते; विशेष करून आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने (ILO) निर्धारित केलेल्या कामाच्या मूलभूत हक्कांशी संबंधित तत्वांना Clariant ओळखते:

–
संघटना करण्याचे स्वातंत्र्य आणि सामूहिक सौदेबाजी करण्याचा अधिकार;

–
वेठ बिगारी नाही;

–
बाल कामगार नाही;

–
भेदभाव नाही.

Clariant साठी काम करणे ही एक निवडीची बाब आहे. आम्ही वेठ बिगारी, बाल कामगार, आणि मानवी तस्करी यांच्या कोणत्याही स्वरूपाचा धिक्कार करतो, आणि त्याच्या विरोधात स्वयंसक्रियतेने काम करतो.

वये पडताळण्याजोगी आहेत आणि कामाच्या वयाशी संबंधित सर्व कायदेशीर आवश्यकता पूर्ण केल्या जातात याची खात्री करण्यासाठी सर्व उपलब्ध प्रक्रियांचा आम्ही वापर करतो.

→ हे देखील पहा
मानवी हक्कांचा आदर करणे

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी बातम्यांमध्ये वाचले की माझा एक सहकारी कंत्राटदार एका प्रकल्पावर काम करण्याचा विचार करत आहे जो बाल कामगारांना वापरण्यासाठी ज्ञात आहे. मी त्या प्रकल्पामध्ये गुंतलेलो नाही. मी काही बोलले पाहिजे का?

**उत्तर:**
होय. तुमची निरीक्षणे तुमच्या सहकाऱ्याशी शेअर करा आणि, ते या पुरवठादारासोबत काम करण्याचा आग्रह धरत असल्यास, आवाज उठवा. बाल कामगारांना वापरण्याच्या इतिहास आहे अशा भागीदाराची निवड करणे अस्वीकारार्ह आहे आणि ते टाळणे आवश्यक आहे. जिथे कोठे बाल कामगाराचा इतिहास आहे आणि ते आता थांबवले आहे असा दावा व्यावसायिक भागीदार करत असल्यास, आपण तसे खरेच असल्याची पडताळणी करण्याची आवश्यकता आहे.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
एक सहकारी कार्य परिषद तयार करू इच्छित आहे. ते पुढे गेल्यास त्यांना काढून टाकण्याची धमकी त्यांचे सुपरवायझर देत आहेत. ते तसे करू शकतात?

**उत्तर:**
Clariant ही ILO च्या चार मूलभत तत्वांनुसार संघटना तयार करण्याच्या स्वातंत्र्याला ओळखते. त्यामुळे, तुमच्या सहकाऱ्याच्या विरोधात प्रतिबंधात्मक कारवाईसाठीचे कोणतेही प्रकरण नाही.

# 3

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी उभरत्या बाजारपेठेच्या व्यावसायिक दौऱ्यावर आहे, त्या भागातील आपल्या एका महत्वाच्या पुरवठादाराच्या कारखान्याला भेट देणार आहे. काही कामगार हे अतिशय तरुण वाटतात आणि मला असे वाटते की ते कायदेशीर वयापेक्षा कमी वयाचे असू शकतात. मी काय केले पाहिजे?

**उत्तर:**
तुमच्या चिंता कारखाना व्यवस्थापकाशी थेटपणे स्पष्ट करून घेण्याचा प्रयत्न करा. जर त्यांनी तुम्हाला सर्व कामगार हे वय आवश्यकतांची पूर्तता करत असल्याची खात्री दिल्यास, हे पुष्टीकरण तुम्हाला लिखित स्वरुपामध्ये मिळेल याची खात्री करा. कोणत्याही प्रकरणामध्ये, तुमच्या चिंता अंतर्गतपणे तुमच्या सुपर-वायझर, HR आणि अनुपालन यांना कळवा.

# आम्ही सर्वोच्च नीतिमत्ता मानके आणि कायदा यांचे पालन करतो

कायदे मूलभूत हक्कांचे संरक्षण करतात आणि समाजामधील अपेक्षित वर्तणुकींच्या किमान मानकांसाठी ते मार्गदर्शक असतात. एक आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत कंपनी म्हणून, आमच्या सर्व भागधारकांचा विश्वास प्राप्त करण्यासाठी, आमचा लौकिक तयार करण्यासाठी आणि उत्तम शाश्वत व्यवसायाला पाठबळ देण्यासाठी नीतिमत्तेच्या सर्वोच्च मानकांनुसार आणि सच्चेपणाने कार्यरत राहण्याची खातरजमा Clariant करेल. अनुपालन न करण्याच्या परिणामांमध्ये जबरी दंड आणि काही प्रकरणांमध्ये, गुंतलेल्या व्यक्तींना तुरुंगवास, तसेच लौकिकाची गंभीर हानी यांचा समावेश होतो.

सर्व कायदे आणि नियमने, आमची नीतिमत्ता संहिता, अंतर्गत धोरणे आणि मार्गदर्शक तत्वे यांचे, त्याचप्रमाणे Clariant ला पालन करणे बंधनकारक आहे अशा सर्व संबंधित रासायनिक उद्योग संहितांचे आम्ही पालन करतो.

या विभागामध्ये:

–

निकोप स्पर्धा

–

लबाडी

–

इनसायडर ट्रेडिंग

–

मनी लॉंड्रिंग

–

एम्बार्गो आणि व्यापार नियंत्रण तरतुदी

# निकोप स्पर्धा

**Clariant मुक्त आणि निकोप स्पर्धेवर विश्वास ठेवते आणि तिचे ग्राहक आणि पुरवठादार यांच्याशी उचित रितीने वागते. आम्ही स्पर्धात्मक फायदा हा कामगिरी आणि आपल्या उत्पादनांच्या सर्वोत्कृष्टतेमधून आणि अनीतीपूर्ण किंवा बेकायदेशीर व्यवसाय पद्धतींचा वापर न करता प्राप्त करतो**

**स्पर्धाविरोधी आणि वाजवी-व्यापार कायदे हे स्पर्धेला प्रोत्साहन देण्यासाठी आरेखित असतात, ज्यांयोगे उत्पादन निवडीच्या विस्तृत श्रेणीतून आणि नावीन्यपूर्ण उपाययोजनांच्या निवडीमधून ग्राहकांचा फायदा होईल याची खातरजमा होते. ते हमी देतात की आमचे काम आणि ग्राहक-चालित नावीन्यपूर्णता यांना आमच्या उत्पादनांच्या आणि सेवांच्या यशातून पुरस्कार मिळतो.**



**Clariant मध्ये आम्ही या कायद्यांचे कठोरपणे पालन करतो. याचा अर्थ असा आहे की ज्याच्या परिणामस्वरूपी स्पर्धा मर्यादित होऊ शकत असल्यास, आम्ही व्यवसाय माहिती कोणत्याही तृतीय-पक्षांशी शेअर करत नाही. त्यामुळे आम्ही फक्त विधीसंमत व्यवसाय उद्देशासाठी माहितीची देवाणघेवाण करतो. स्पर्धकांबरोबर स्पर्धात्मक संवेदनशील माहिती शेअर करत नाही. आम्ही आमच्या व्यावसायिक व्यूहनीती, धोरणे, व्यावसायिक वर्तणूक आणि, खास करून, आमच्या किंमती स्वतंत्रपणे ठरवतो. आम्ही या बाबतीत स्पर्धकांशी, थेटपणे किंवा तृतीय-पक्षांच्या मार्फत हातमिळवणी करत नाही. तसेच, आम्ही आमच्या स्पर्धकांसोबत ग्राहक, प्रदेश किंवा उत्पादन बाजारपेठांची चर्चा, मान्यता किंवा वाटप करत नाही.**

**Clariant ची उत्पादने आणि सेवा ग्राहकांसाठी प्रिमीयम निवडी देऊ करु शकत असल्या, तरी आम्ही अनुचित व्यवहारांमध्ये गुंतून आमच्या बाजारपेठेतील सामर्थ्याचा किंवा संभाव्य वर्चस्वी बाजार स्थानाचा गैरवापर करत नाही.**

**एखादा विशिष्ट तृतीय-पक्ष स्पर्धक आहे की नाही याबद्दल आम्हाला शंका असल्यास किंवा खात्री नसल्यास, किंवा वर नमूद करण्यात आलेल्या परिस्थिती उद्भवली किंवा उद्भवू शकत असली, तर आम्ही विधी विभागाशी संपर्क साधतो.**

## स्पर्धक

त्याच संबंधित उत्पादनाच्या बाजारात सक्रीय आहे अशी कोणतीही कंपनी (किंवा व्यक्ती) ही स्पर्धक आहे. सारख्याच बाजारांमध्ये किंवा त्याच किंवा त्यासारख्या बाजारामध्ये अन्य भौगोलिक क्षेत्रांमध्ये सक्रीय आहे अशा कंपनी (किंवा व्यक्ती) ला देखील स्पर्धक म्हणून समजले जाऊ शकते. आमची उत्पादने वितरित करतो असा वितरक कमीत कमी वितरणाच्या स्तरावर स्पर्धक असतो याची नोंद घ्या. Clariant सारखीच उत्पादने सोर्स करत असलेला एखादा पुरवठादार वरच्या अंगाच्या खरेदी बाजारातील एक स्पर्धक असतो .

## स्पर्धात्मकरीत्या संवेदनशील माहिती

सुलभ नियम म्हणून, जी माहिती सार्वजनिक डोमेनमध्ये नाही, जी गोपनीय आहे किंवा जी एखाद्या (संभाव्य) स्पर्धकाच्या व्यूहात्मक वर्तणूकीवर प्रभाव पाडू शकते, ती स्पर्धात्मकरीत्या संवेदनशील असते. यामध्ये समाविष्ट आहे अशी माहिती

(i) जिचा इतर पक्षाच्या भविष्यातील स्पर्धा वागणुकी प्रभाव पडू शकतो,

(ii) तुमच्या व्यवसायाबद्दल किंवा रणनीतिबद्दल की जी तुम्हाला स्पर्धकांबद्दल माहिती करून घ्यावयाची नाही, किंवा

(iii) जी एक उपभोक्ता किंवा पुरवठादार तुम्ही तृतीय-पक्षासह सामायिक करावी असे इच्छित नाही.

**→ हे देखील पहा**
माहिती सुरक्षितता
इनसायडर ट्रेडिंग
माध्यम संबंध आणि गुंतवणूकदार संबंध

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी विक्री विभागामध्ये काम करत आहे आणि मला आपल्या खरेदी संघाकडून पुरवठादारांकडील विविध कच्च्या मालाच्या आणि रसायनांच्या किंमती आणि किंमतींचे कल यांच्या माहितीसह तपशीलवार मासिक अहवाल प्राप्त होतो. या पुरवठादारांपैकी काही पुरवठादार अहवालामध्ये नमूद केलेल्या विशिष्ट उत्पादनांसाठी Clariant शी खालच्या स्तराला स्पर्धा देखील करत आहेत. मला अशी माहिती प्राप्त व्हावी की नाही याची खात्री नाही आणि ही माहिती कोठून येते याचे देखील मला आश्चर्य वाटते. मी त्याबद्दल विचारावे का?

**उत्तर:**
विक्रीमध्ये असल्याने तुम्हाला कच्चा माल आणि रसायने यांबाबतचा खरेदीची एकत्रित माहिती प्राप्त होऊ शकत असेल, परंतु तुम्हाला Clariant देखील विक्री करत असलेल्या उत्पादनांबाबतचा व्यक्तिगत पुरवठादारांची माहिती प्राप्त होता कामा नये. Clariant वापरते ती सर्व डेटा आणि माहिती एका कायदेशीर स्त्रोतापासून येत असली पाहिजे आणि ती बेकायदेशीर संपर्कांमधून येत नाही. Clariant स्पर्धकांकडून खरेदी करू शकते, मात्र देवाणघेवाण करण्यात येणारी माहिती ही अत्यंत किमान आवश्यकतेइतकीच मर्यादित असली पाहिजे. याशिवाय, खरेदीकडे असलेली ही माहिती खरेदीद्वारे विक्रीला अग्रेषित केली जाता कामा नये. शंका असल्यास, तुम्ही डेटाचा स्त्रोत नेहमी स्पष्ट केला पाहिजे आणि तुम्हाला खात्री नसल्यास मार्गदर्शनासाठी विधी विभागाकडे संपर्क साधा. विधी विभागाला प्रश्न किंवा सल्ल्यासाठी विचारणे हे प्रत्येकाचे कर्तव्य व हक्क आहे.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी एका औद्योगिक परिषदेत आहे जिथे माझा पूर्वीचा सहकारी मला भेटला. त्याने मला उद्योगातील सहयोगी यांच्यासह बाजाराच्या अवघड परिस्थितीबद्दल आणि संभाव्य उपाययोजना याबद्दल एक अनौपचारिक चर्चा करण्यासाठी एकत्रित रात्रीच्या भोजनाला हजर राहणे आवडेल का असे विचारले. मी माझी विक्री लक्ष्ये साध्य करण्याच्या दबावाखाली आहे. मी रात्रभोजनाला हजर राहावे का आणि याचा फायदा परिस्थिती सुधारण्यामध्ये होतो का ते पहावे का?

**उत्तर:**
तुम्ही रात्रभोजनाला हजर राहता कामा नये. अनौपचारीक मार्गाने माहिती अदलाबदल होण्याबाबत नेहमी सावध राहा. उद्योगातील सहयोगीशी तुमच्या व्यापार कामगिरीबद्दल तुम्ही बोलता कामा नये. हे बेकायदेशीर आहे. जरी तुम्हाला वाटले की हे कधीच उघडकीला येऊ शकणार नाही किंवा या अवघड बाजारपेठ परिस्थितीमध्ये किंवा व्यावसायिक लक्ष्ये पूर्ण करणे साध्य करण्यास तुम्हाला मदत होण्यास काही अंतरदृष्टी प्राप्त होईल, तरी अशा वर्तणुकीला Clariant मध्ये सहन केला जात नाही आणि त्याचे परिणाम तुमच्या आणि तुमच्या कंपनीसाठी हानीकारक असू शकतात.

# लबाडी

आपल्या वर्तणुकीमध्ये आणि आपण जे काही करतो त्यामध्ये सच्चेपणा असणे हे अतिशय महत्वाचे आहे आणि त्याला आपल्या व्यावसायिक भागीदारांनी गंभीरपणे घेतले पाहिजे आणि त्याचा आदर केला पाहिजे. Clariant बद्दलची किंवा संबंधित कोणतीही माहिती आपण तयार करतो किंवा पुरवतो ती अचूक आणि सत्याला प्रतिबिंबित करणारी असणे आवश्यक आहे. आम्ही कोणत्याही प्रकारच्या कपटशीर कृतीला आरंभ करत नाही किंवा त्यामध्ये सहभागी होत नाही.

म्हणून, आपल्यापैकी प्रत्येकजण खात्री करेल की आपण आपल्या प्रणालींमध्ये योग्य आणि अचूक माहिती भरतो आणि आपण प्रक्रियांचे व व्यवहारांचे दस्ताऐवजीकरण खरेपणाने करतो. कायद्याने आवश्यक असल्याशिवाय किंवा आपल्या नोंदी राखण्याच्या कार्यक्रमांचे पालन करण्यासाठी आवश्यक असल्याशिवाय, आपण व्यवहार नोंदी बदलत नाही किंवा त्यांची विल्हेवाट लावत नाही. आम्ही चाचणीचे परिणाम किंवा डेटामध्ये हातचलाखी करत नाही किंवा त्यात खोटेपणा करत नाही.

याची, आमच्या डेटामध्ये सच्चेपणाची खात्री करण्यास, लबाडी रोखण्यास आणि शोधण्यास मदत होते. आम्ही खात्री करतो की आम्ही लबाडीला लपवण्यामध्ये गुंतलेलो नाही. आम्ही कोणतीही संशयास्पद माहिती, व्यवहार किंवा कृती अनुपालन किंवा विधीला तत्काळ कळवतो.

बऱ्याचशा न्यायाधिकारक्षेत्रांमध्ये लबाडी हा त्यामध्ये गुंतलेल्या व्यक्तिगतांच्या वैयक्तिक जबाबदारीसह गुन्हेगारी अपराध आहे.

## लबाडी

लबाडीमध्ये, कोणताही आर्थिक फायदा किंवा अन्य फायद्यामध्ये परिणामित होण्याच्या उद्देशाने केलेल्या कोणत्याही फसवणाऱ्या, जाणीवपूर्वक कृतीचा किंवा वगळण्याच्या कृतींचा समावेश आहे. यामध्ये समावेश आहे मात्र त्यापुरतेच मर्यादित नाही जसे:

- बनावट करणे;
- ज्यासाठी तुम्हाला सामान्यतः प्रवेश मिळणार नाही अशी माहिती मिळविण्यासाठी खोटे बोलणे किंवा फसवणूक करणे;
- कंपनीच्या मालमत्तेची चोरी;
- हेतुपुरस्सर दिशाभूल करणारी माहिती पुरवणे
- कंपनीचे रेकॉर्ड चुकीचे बनविणे जसे की कामाच्या वेळांचे रेकॉर्ड किंवा खर्चाचे विवरण;
- चाचणी परिणामांमध्ये फेरफार करणे;
- हेतुपुरस्सर तथ्य नष्ट करणे किंवा लपवणे ज्याचा हेतू इतरांना फसवणे हा आहे
- काल्पनिक किंवा दिशाभूल करणाऱ्या नोंदींचे रेकॉर्डिंग;
- निधी किंवा इतर कंपनीच्या मालमत्तेचा गैरव्यवहार;
- फसवणूक झाल्याबद्दल माहिती असताना कृती करणे टाळणे/ ते स्वीकारणे;
- लाचलुचपत.

**→ हे देखील पहा**
अचूक पुस्तके आणि नोंदी
मनी लॉंड्रिंग
लाचलुचपत आणि भ्रष्टाचार

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी आताच व्यावसायिक ट्रिपवरून आलो आणि माझा खर्चाचा अहवाल करताना, मला जाणवले की, मी माझ्या स्थानिक संघासह रात्रीच्या भोजनाला ज्या रेस्टॉरंटमध्ये गेलो होतो त्यांच्याकडून पावती घेण्यास विसरलो आहे. आम्ही काय घेतले ते मला थोडक्यात आठवते. मी Excel शीट मध्ये जेवणाची यादी करून आणि त्याचा वापर पावती म्हणून करू शकतो का?

**उत्तर:**
नाही, तयार केलेल्या पावत्या हा पर्याय नाही. तुम्ही तुमच्या सुपरवायझरशी आणि वित्त विभागाशी खर्चाचा परतावा तुम्हाला कसा परत मिळू शकेल याबद्दल बोलले पाहिजे.

# इनसायडर ट्रेडिंग

**Clariant येथे, सर्व समभागधारक, भागधारक आणि सर्वसाधारण लोक यांना एकाचवेळी आपल्या कंपनीच्या समभाग किंमतीशी संभाव्यत: संबंधित कोणतीही माहिती कळविली जाते याची आम्ही खात्री करतो.**

**म्हणून, आम्ही व्यक्तिगत फायद्यासाठी कधीही Clariant बद्दलची गोपनीय माहिती वापरता कामा नये. आम्ही एका कंपनीबद्दलची अंतर्गत माहिती ताब्यात असताना तिचे स्टॉक खरेदी किंवा विक्री कधीही करता कामा नये.**

**आम्ही अशी माहिती अन्य कोणालाही हस्तांतरित करत नाही. यामध्ये समावेश आहे – मात्र तेवढ्या पुरती मर्यादीत नाही – कौटुंबिक सदस्य आणि त्याच घरातील अन्य निवासी, सहकारी, मित्र, पत्रकार, ग्राहक, आर्थिक विश्लेषक आणि सल्लागार. शंका आल्यास आम्ही विधी विभागाशी सल्लामसलत करतो.**

## इनसायडर माहिती

इनसायडर माहिती ही अशी सर्व माहिती असते जी लोकांना माहीत नसते आणि तिचा परिणाम हा शेअर किंमती किंवा अन्य आर्थिक साधनांवर होऊ शकतो. यामध्ये, नियोजित अधिग्रहणे, निर्गुंतवणुकी, धोरणात्मक सहयोग, वित्तीय निकाल, नवीन उत्पादने, नवीन उत्पादन विकास किंवा व्यूहनीती, भांडवली संरचनेमधील बदल, व्यवस्थापनातील प्रमुख करारनामे किंवा बदल यांची गोपनीय माहिती याचा समावेश असतो.

**→ धोरणे**
इनसायडर ट्रेडिंग धोरण

**→ हे देखील पहा**
अचूक पुस्तके आणि नोंदी
माहिती सुरक्षितता
डेटा खाजगीयता

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मला आता Clariant च्या आगामी विक्री आकडेवारीबद्दलच्या पूर्वानुमानाचा समावेश असलेली प्रिंटआऊट प्रिंटरच्या शेजारी आढळून आली. मी त्याचे काय केले पाहिजे?

**उत्तर:**
तुम्ही त्या कागदाची श्रेडरने विल्हेवाट लावली पाहिजे किंवा तो तत्काळ गोपनीय रद्दी बिनमध्ये टाकून दिला पाहिजे. या प्रिंटआऊटमध्ये शेअर किंमतीच्या संवेदनशील माहितीचा समावेश आहे आणि त्यामुळे त्याला सर्वाधिक गोपनीयतेने हाताळले पाहिजे. ज्यांना प्रिंटरमध्ये प्रवेश आहे त्यांच्यामध्ये गोपनीय माहितीच्या संरक्षणाचे व्यक्तिगत दायित्व असल्याचे सांगण्याची गरज ओळखण्यासाठी त्याबद्दल तुमच्या सुपरवायझरशी बोला. प्रिंटआऊट मधील सामग्री अन्य कोणाबरोबरही शेअर करू नका आणि जोपर्यंत संबंधित विक्री आकडेवारी अधिकृतरित्या सार्वजनिक केली जात नाही तोपर्यंत Clariant समभागांमध्ये व्यवहार करण्यापासून दूर राहा..

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
स्थानिक टाऊनहॉल बैठकीमध्ये, एका नेत्याने नमूद केले की Clariant चे तिमाही निकाल हे चांगले नसल्या कारणाने ती लक्षणीय दबावाखाली आहे आणि आपल्यापैकी प्रत्येकाला परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागणार आहेत. हे मला चांगले वाटत नाही आणि मी माझे Clariant शेअर तिमाही निकाल जाहीर होण्याच्याआधी विकण्याचा विचार करत आहे. मी तसे करणे योग्य आहे का?

**उत्तर:**
नाही, तुम्ही योग्य नाही. जर तुमच्या ताब्यात गैर-सार्वजनिक किंवा (संभाव्यता) शेअर किंमत-संवेदनशील माहिती असल्यास, ट्रेडिंग मार्केटमध्ये वैयक्तिक फायदा मिळवण्यास अशा ज्ञानाचा वापर तुम्ही करू नये. तसेच, तुम्ही तुमच्यावतीने अन्य कोणालाही ट्रेड करण्यास सांगू नये. इनसायडर ट्रेडिंग हा गुन्हेगारी अपराध आहे आणि त्याचा परिणाम गुंतलेल्या व्यक्तींसाठी मोठा दंड आणि कारावास होण्यामध्ये होऊ शकतो. तुम्ही विधी विभागाशी सल्लामसलत केली पाहिजे कारण या बैठकीतील अन्य सहभागी सहकारी देखील इनसायडर झालेले आहेत.

# मनी लाँड्रिंग

**Clariant हे मनी लाँड्रिंग आणि दहशतवादाला वित्तपुरवठा करणे याविरोधातील आंतरराष्ट्रीय लढ्याला वचनबध्द आहेत.**

**Clariant मनी लाँड्रिंगच्या प्रतिबंधनाशी संबंधित सर्व कायद्यांचे पालन करते. आम्ही कधीही मनी लाँड्रिंग म्हणून ओळखल्या जाऊ शकणाऱ्या कृतींमध्ये स्वतःला गुंतवण्यास मान्यता देत नाही किंवा तशा कृतींना कधीही सहन करत नाही.**

**मनी लाँड्रिंग**

मनी लाँड्रिंगचा संदर्भ हा गुन्हेगारी कृतीमध्ये उत्पन्न होणाऱ्या पैशाचा वापर नियमित अर्थव्यवस्थेमध्ये करणे, त्याला कायदेशीररित्या प्राप्त केलेला आहे असे भासवणे. यासाठी आपल्या आंतरक्रियांमध्ये दक्षतेची आवश्यकता आहे. ते अप्रत्यक्षरितीने तृतीय-पक्षांच्या (त्रयस्थांच्या) मार्फत गुंतण्याला देखील लागू आहे.

**→ हे देखील पहा**
अचूक पुस्तके आणि नोंदी
लाचलुचपत आणि भ्रष्टाचार
लबाडी



# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी एका तृतीय-पक्ष (त्रयस्थ) वितरकासोबत दीर्घकाळापासून काम करत आहे आणि अलिकडेच त्यांच्याबद्दल अशा अफवा ऐकल्या की ते मनी लाँड्रिंगमध्ये गुंतलेले आहेत. मी त्याच्यासोबत काम करणे पुढे सुरू ठेवू शकतो का?

**उत्तर:**
अफवा ज्ञात झाल्यानंतर, विधी किंवा अनुपालन विभाग यांच्याशी परिस्थितीला आणि त्यांच्या संभाव्य दायित्वाला चांगल्या प्रकारे समजावून घेण्यास संपर्क साधा. विधी किंवा अनुपालन विभाग तुम्हाला तृतीय-पक्षाच्या (त्रयस्थाच्या) सच्चेपणाची खात्री करण्यात किंवा आरोपांबाबत पुरावा मिळवण्यात त्याच्या तपशीलवार मूल्यमापनामध्ये मदत करतील. अफवांकडे दुर्लक्ष करणे आणि नेहमीप्रमाणे व्यवसाय करणे पुढे सुरू ठेवणे ही चुकीची वर्तणूक असू शकते.

# व्यापारबंदी आणि व्यापार नियंत्रण तरतुदी

**Clariant चे जगभरात व्यावसायिक संबंध आहेत आणि ते दररोज वस्तू आणि सेवा यांच्या जागतिक व्यापारामध्ये गुंतलेले आहेत.**

**आम्ही जिथे व्यवसाय करतो, तिथे लागू असलेल्या सर्व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय निर्यात, आयात आणि व्यापार अनुपालन कायद्यांचे आम्ही पालन करतो. यामध्ये वस्तूंच्या निर्यात, आयात किंवा स्थानिक व्यापाराला प्रतिबंध आणि मनाई यांचा समावेश होतो.**

**निर्बंध हे वस्तूंचे स्वरूप, उगमाचा देश किंवा अंतिम वापर, ग्राहकाची किंवा तृतीय-पक्ष सेवा प्रदात्याची ओळख किंवा व्यापारामध्ये गुंतलेले कर्मचारी यावर अवलंबून असतात. वस्तूंना लागू असण्याबरोबरच असे निर्बंध तंत्रज्ञानांना आणि सेवांना त्याचप्रमाणे भांडवल आणि पेमेंट व्यवहारांना लागू असू शकतात.**

**आम्ही जेव्हा वस्तू खरेदी, उत्पादित, विक्री किंवा अन्यथा हस्तांतरीत करतो, आणि जेव्हा तंत्रज्ञाने हस्तांतरित किंवा अधिग्रहित केली जातात, तेव्हा लागू असलेल्या व्यापार नियंत्रण नियमनांचे पालन करतो. दुहेरी-उपयोगाच्या उत्पादनांची हाताळणी, दहशतवादाशी लढा आणि रासायनिक शस्त्रास्त्रे यांच्या संबंधी नियमनांचे देखील आम्ही पालन करतो.**



# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
एका वितरकाला Clariant च्या उत्पादनांपैकी एकाबद्दल स्वारस्य आहे. बऱ्याचदा, हे उत्पादन इराणला वितरीत केले जाते आणि, जशी मला जाणीव आहे की तिथे त्या उत्पादनांवर बहिष्कार आहे, मी वितरकाला त्यांच्या अंतिम ग्राहकाबद्दल विचारले. मला स्पष्ट उत्तर मिळाले नाही. मला अधिक स्पष्टीकरण मिळवण्याची गरज आहे, की मी विक्रीमध्ये पुढे गेले पाहिजे?

**उत्तर:**
बहिष्कार घातलेल्या देशांमधील संभाव्य वितरणांना हाताळताना, आपण अनुपालित राहिल्याची खात्री करण्यासाठी नेहमी अनुपालन आणि सीमाशुल्क आणि परकीय व्यापार यांच्याशी सल्लामसलत करा. ही बाब कोणतीही विक्री पूर्ण करण्यापूर्वी आणखी स्पष्ट करण्यात आली पाहिजे.

# आम्ही सुरक्षिततेला प्राधान्य देतो आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत

आम्हाला स्वत:चे आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याबद्दलचे महत्व माहीत आहे. एक कंपनी आणि व्यक्ती म्हणून, आम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीच्या गाभ्याशी आम्ही सुरक्षितता आणि हित यांना ठेवतो आणि पर्यावरणावर पडणाऱ्या आमच्या प्रभावाला कमी करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

या विभागामध्ये:

–

पर्यावरण

–

आरोग्य आणि सुरक्षितता

–

उत्पादन धुरीणत्व

# पर्यावरण

**Clariant मध्ये पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या आपल्या जबाबदारीची आम्हाला जाणीव आहे आणि आम्ही पर्यावरणावरील आमच्या प्रभावाला कमी करण्यास वचनबद्ध आहोत.**

**आम्ही पर्यावरणविषयक सर्व कायदे, धोरणे आणि मार्गदर्शक तत्वे यांचे पूर्णपणे पालन करण्याची खात्री करतो, आणि आम्ही स्थानिक समाजावरील प्रभावाच्या समावेशासह पर्यावरणाच्या जोखमी आणि प्रभाव यांना कमी करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न चालू असतो.**

**साहित्याच्या कार्यक्षमतेची खात्री करण्यासाठी आणि कचरा निर्मिती शक्य तेवढी कमी करण्यासाठी आम्ही आमच्या साहित्याचा वापर कमी करतो, पुनर्वापर करतो आणि ते रिसायकल करतो.**

**आम्ही योग्य ठिकाणी आवश्यक आणि उचित धोका प्रतिबंधने ठेवतो. आम्ही एखादी घटना घडल्यास द्रुतगतीने आणि उचित प्रकारे प्रतिसाद देण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन प्रणाली प्रचालित केलेली आहे.**

## 1

### शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
जागतिक आपत्कालीन व्यवस्थापन संघाद्वारे केल्या जाणाऱ्या आपत्कालीन चाचणीबद्दल सूचित करणारा एक फोन मला आला. मला आपत्कालीन संघाला शक्य तितक्या लवकर भेटण्यास सांगण्यात आले. मला समयसीमा आजच पूर्ण करावयाची गरज आहे, म्हणून मी हजर राहण्याची गरज नाही, बरोबर?

**उत्तर:**
आपत्कालीन चाचण्या ह्या गंभीरपणे घेतल्या पाहिजेत. प्रत्यक्ष आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास आपण तयार असणे अत्यंत महत्वाचे आहे. आपत्कालीन परिस्थिती या कर्मचाऱ्यांसाठी आणि Clariant साठी गंभीर धोका असू शकतात आणि त्यांना प्राधान्याच्या म्हणून वागवणे आवश्यक आहे – अगदी काही समयसीमा चुकल्या तरी देखील.

## 2

### शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी पाहिले की माझी एक सहकारी आपल्या उत्पादन स्थळावरील रासायनिक कचरा असल्यासारखे वाटणारे काहीतरी जवळपासच्या नदीमध्ये विल्हेवाटीसाठी टाकत आहे. असे करण्याची अनुमती आहे का असे तिला विचारले असता, तिने या प्रकारच्या उत्पादनासाठी काही समस्या नाही असे म्हणत पुष्टी केली. अशा विल्हेवाटीला परवानगी आहे याची मला तरीही खात्री नाही. परिस्थितीला पुढे आणखी स्पष्ट करणे माझ्यावर आहे का?

**उत्तर:**
तुम्हाला जर अशी चिंता असेल जिचे स्पष्टीकरण दिले जात नाही, तर तुम्ही आवाज उठवला पाहिजे. Clariant पर्यावरणाचे संरक्षण करण्यास वचनबद्ध आहे म्हणून ही विल्हेवाट स्थानिक नियमनांनुसार आहे याची खात्री करण्यासाठी तुम्ही तुमची निरीक्षणे ESHA कडे शेअर केली पाहिजेत.

# आरोग्य आणि सुरक्षितता




निरोगी आणि सुरक्षित कार्य वातावरण हे Clariant च्या मुख्य प्राधान्यांपैकी एक आहे आणि आम्ही ही जबाबदारी अतिशय गंभीरपणे घेतो. Clariant कडे एक आरोग्य आणि सुरक्षितता व्यवस्थापन प्रणाली आहे जी साईटवरील सर्वांना – Clariant कर्मचारी त्याचप्रमाणे कंत्राटदार आणि अभ्यागत यांच्यासह प्रत्येकाला संरक्षित करते. ती पद्धतशीरपणे जोखमींना ओळखून आणि सुधारणात्मक उपाययोजना स्थापित करून आपल्याला अपघातांपासून रोखण्यास देखील मदत करते.

आपल्यापैकी प्रत्येकाला जे आपल्या जबाबदारीच्या क्षेत्रामध्ये लागू होतात अशा नियमांची जाणीव असली पाहिजे – यामध्ये आवश्यकता म्हणून घेण्यात येणाऱ्या सुरक्षितता आणि आपत्कालीन सुरक्षितता प्रशिक्षणांना हजर राहण्याचा समावेश आहे. आम्ही कार्यस्थळ आरोग्य आणि सुरक्षितता यांच्याशी संबंधित सर्व नियामक आवश्यकतांचा आदर करतो आणि आम्ही संबंधित जोखमी कमी आणि व्यवस्थापित करतो. तसेच, तरुण किंवा असुरक्षित कामगारांच्या समावेशासह कार्यबलाच्या आत लागू होऊ शकणाऱ्या विशेष गरजांचा आम्ही काळजीपूर्वक विचार करतो.

आरोग्य आणि/किंवा सुरक्षितता प्रसंगाच्या घटनेमध्ये, आम्ही पुढील अन्वेषणासाठी जबाबदार ESHA व्यवस्थापकाकडे तिचा तत्काळ अहवाल देतो. Clariant च्या ESHA मार्गदर्शक तत्वांनुसार प्राधान्य म्हणून आवश्यक सुधारणात्मक कृती लागू केल्या जातात.

## तरुण कामगार

18 वर्षे वयाच्या खालील सर्व कामगारांना तरुण कामगार म्हणून समजले जाते.

## असुरक्षित व्यक्ती

या समूहामध्ये गरोदर महिला, Clariant च्या वैद्यकीय संनिरीक्षणाच्या बाहेरील तात्पुरते कामगार, प्रशिक्षणार्थी, स्तनपान देणाऱ्या माता आणि विशिष्ट आरोग्य स्थितीसह असलेले कर्मचारी यांचा समावेश होतो.

**→ हे देखील पहा**
मानवी हक्कांचा आदर करणे



**आपणा सर्वांना Clariant च्या जीवन-रक्षक नियमांची जाणीव असणे आवश्यक आहे:**

– **1.80 मीटर किंवा 6 फूटांपेक्षा जास्त उंचीवर काम करताना आणि सुरक्षा असलेल्या क्षेत्राच्या बाहेर काम करताना फॉल प्रोटेक्शनचा वापर करा;**

– **आवश्यक असेल तेव्हा नेहमी वैध कार्य परवान्यासह काम करा;**

– **तुम्हाला धोक्यापासून वाचवण्यासाठी 'लॉक आउट / टॅग आउट' प्रक्रिया वापरा;**

– **आवश्यक असल्यास वैयक्तिक सुरक्षा उपकरणे (पीपीई) घाला;**

– **लटकत्या वजनांखाली चालू नका किंवा काम करू नका;**

– **अधिकृततेशिवाय आणि अतिरिक्त सुरक्षा खबरदाऱ्या घेतलेल्या नसताना सुरक्षा महत्त्वाची असणारी उपकरणे अक्षम करू नका.**

**या नियमांच्या उल्लंघनाचे तुम्ही साक्षीदार असल्यास, तुम्ही तत्काळ तुमच्या लाइन व्यवस्थापकांशी किंवा ESHA शी बोलले पाहिजे.**

# उत्पादन धुरीणत्व

नाविन्यपूर्ण, सुरक्षित आणि अधिक शाश्वत उपाययोजना प्रदान करणे हे आमच्या सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक आहे. आम्ही संपूर्ण मूल्य श्रृंखलेदरम्यान रसायनांच्या सुरक्षित वापराला व व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहोत. म्हणूनच, Clariant हे Responsible Care®, रासायनिक उद्योगाची शाश्वततेप्रती वचनबद्धता चे स्वाक्षरीकर्ता आहेत.

आम्ही रसायनांबाबत नियामक आवश्यकतांचे पालन करतो आणि तडजोड न करता मानके आणि मार्गदर्शक तत्वे पाळतो. ही आमच्या उत्पादनांचे संशोधन, विकास आणि उत्पादन यांमधील सर्वोच्च स्वच्छतेची मानके आणि कठोर गुणवत्ता नियंत्रण यांची खात्री देतात.

आमची रसायने कशी सुरक्षितपणे हाताळावीत आणि वापरावीत यांबाबतच्या समग्र मूल्यमापन आणि ग्राहक संप्रेषणाद्वारे (ग्राहकांकडून परस्परांतील संवादाद्वारे) आम्ही रासायनिक सुरक्षिततेच्या आमच्या वचनबद्धतेची खात्री देतो. याशिवाय, आमचे ध्येय हे पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्य यांना असलेल्या कोणत्याही जोखमी सातत्याने किमान करणे आणि उत्पादन विकासामध्ये सुस्पष्ट शाश्वततेचा दृष्टिकोन अंतर्भूत करण्याची खात्री करणे हे आहे, ज्याने दीर्घ-कालीन व्यवसाय आणि शाश्वततेवर आधारित उत्पादन पोर्ट फोलिओची अनुमती मिळेल.

**→ हे देखील पहा**
बौद्धिक संपदा

# आम्ही भ्रष्टाचाराशी लढण्यास वचनबद्ध आहोत

भ्रष्टाचाराचा समाज आणि अर्थव्यवस्था यावर विध्वंसक परिणाम होतो, जो असमानता तयार करतो आणि आर्थिक असुरक्षिततेला कारणीभूत होतो, संपत्तीचा ऱ्हास करतो आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाला खीळ घालतो. Clariant मध्ये आम्ही कोणत्याही स्वरूपाच्या भ्रष्टाचार सहन करत नाही आणि आमच्या व्यावसायिक कृतींमध्ये लाचलुचपतीला रोखण्यासाठी आवश्यक ती कोणतीही कारवाई करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

या विभागामध्ये:
–
लाच लुचपत आणि भ्रष्टाचार
–
भेटी आणि आमंत्रणे
–
राजकीय कृती

# लाचलुचपत आणि भ्रष्टाचार

Clariant मध्ये आम्ही आमचा व्यवसाय प्रामाणिकपणे आणि सच्चेपणाने करतो. आम्ही लाचलुचपत यांच्यासारख्या अनुचित, अवाजवी आणि बेकायदेशीर मार्गांमार्फत फायदे घेत नाही.

म्हणूनच, लाचलुचपत आणि भ्रष्टाचार यांना ओळखणे आणि टाळणे हे आमच्या लौकिकाचे संरक्षण करण्यासाठी महत्वाचे आहे.

आम्ही कधीही लाच देत नाही, किंवा आम्ही कधीही लाच स्वीकारतही नाही किंवा जेव्हा आम्ही अधिकाराच्या स्थितीमध्ये असतो तेव्हा परिस्थितीचा अयोग्य फायदा घेण्याचा प्रयत्न करत नाही. एक कंपनी म्हणून, Clariant चे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कोणत्याही तृतीय पक्षाच्या कृतींसाठी आम्हाला देखील जबाबदार धरले जाऊ शकते. त्यामुळे, लाच ही आमच्याद्वारे तृतीय पक्षाने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिली म्हणून यात फरक पडत नाही, आणि, म्हणूनच, आम्ही आमच्या वतीने इतरांना लाचलुचपत करू देत नाही.

आम्ही या संदर्भात Clariant वर असलेल्या जबाबदारीला समजतो आणि आम्ही ती अतिशय गंभीरतेने घेतो. आम्ही लाचलुचपतीला किंवा लाचलुचपत-विरोधी कायद्यांच्या आणि नियमनांच्या जे आमच्या वतीने व्यवसाय करतात त्या तृतीय-पक्षांद्वारे केलेल्या कोणत्याही उल्लंघनाला रोखण्यासाठी करू शकतो ते सर्व काही करू. यामध्ये आमच्या व्यावसायिक भागीदारांची काळजीपूर्वक आणि तपासपूर्वक निवड उचित प्रक्रिया आणि नियंत्रणे कार्यरत करून आणि उचित नियत तपासण्यांचे आयोजन करून करणे याचा समावेश आहे.

Clariant येथे, आम्ही लाच ही रोख रक्कमेच्या स्वरुपात घेतली किंवा भेटी, नोकरीची ऑफर किंवा अन्य कोणताही लाभ यांसारख्या मूल्य म्हणून मानले जाऊ शकणाऱ्या अन्य कोणत्याही स्वरुपात घेतली याचा विचार न करता तिच्यात सार्वजनिक आणि खाजगी लाचलुचपत असा भेदभाव करत नाही.

कोणत्याही मूल्याचे काहीही स्वीकारण्यापूर्वी किंवा देऊ करण्यापूर्वी, आम्ही खात्री करतो की ते आमच्या धोरणांशी सुसंगत आहे आणि आमच्यासाठी स्वारस्याचा संघर्ष तयार करत नाही.

लाचलुचपत आणि भ्रष्टाचार यांना पूर्णपणे ओळखणे नेहमी सोपे नसल्याने, शंकांच्या स्थितीमध्ये आम्ही नेहमी विधी किंवा अनुपालन विभाग यांच्याकडून पुढील मार्गदर्शन प्राप्त करतो.

लाचलुचपत ही गुन्हेगारी अपराधाचे प्रतिनिधीत्व करते आणि, काही न्यायाधिकारक्षेत्रांमध्ये, कंपन्या आणि व्यक्ती या दोन्हींना उच्च दंडासह समान रितीने जबाबदार धरले जाऊ शकते. व्यक्तीला अतिरिक्त कारावासाची शिक्षा मिळू शकते.

## भ्रष्टाचार

नोकरीच्या पदाचा, प्राधिकाराचा किंवा विश्वासाचा अनुचित फायदा मिळवण्यासाठी गैरवापर.

## लाचलुचपत

व्यावसायिक, कंत्राटविषयक, नियामक किंवा व्यक्तिगत फायदा मिळवण्याच्या उद्देशाने देऊ केलेले, वचन दिलेले, बक्षीस दिलेले किंवा प्रदान केलेले काहीही मौल्यवान. सार्वजनिक लाचलुचपत ही सार्वजनिक अधिकारी, कर्मचारी किंवा व्यक्ती जी सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पदावर आहे तिच्याकडे निर्देशित असते, तर खाजगी लाचलुचपत ही भ्रष्टाचाराचे असे स्वरूप आहे ज्यामध्ये सार्वजनिक अधिकारी किंवा सुविधा गुंतलेल्या असणे आवश्यक नाही.

## सार्वजनिक अधिकारी

सार्वजनिक अधिकारी म्हणजे:

- सरकारचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी; किंवा
- कोणताही विभाग, एजन्सी, किंवा त्याचे साधन; किंवा
- एखाद्या सार्वजनिक आंतरराष्ट्रीय संस्थेचे, किंवा
- अशा कोणत्याही सरकार, विभाग, एजन्सी, किंवा इन्स्ट्रुमेंटलिटी, किंवा अशा कोणत्याही सार्वजनिक आंतरराष्ट्रीय संस्थेच्या साठी किंवा वतीने अधिकृत क्षमतेने काम करणारी कोणतीही व्यक्ती.

यामध्ये कुटुंबातील सदस्य, जोडीदार, जवळचे मित्र आणि सार्वजनिक अधिकाऱ्यांसोबत घरात असणारी कोणतीही व्यक्ती यांच्यासारख्या संबंधित व्यक्तींचा समावेश आहे.

**→ हे देखील पहा**
अचूक पुस्तके आणि नोंदी
धर्मादाय योगदाने, प्रायोजकत्व आणि कॉर्पोरेट नागरिकत्व कृती
स्वारस्याचे संघर्ष
लबाडी
मनी लाँड्रिंग

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
विमानतळावर इमिग्रेशन प्रक्रिया ही पारदर्शक रितीने वर्णन केली जाते, आणि व्हिसा शिक्का हा मोफत आहे. तरीदेखील, मला व्हिसा शिक्क्यासाठी लहान शुल्क भरण्यास सांगण्यात आले आणि प्रत्येकजण ते भरत होते. मी देखील ते भरावे का?

**उत्तर:**
सुविधेसाठी पेमेंट ("ग्रीझ" किंवा "स्पीड-अप" शुल्क म्हणून देखील संदर्भित केले जाते) हे एक लहान पेमेंट असते जे तुम्हाला कायदेशीररित्या देय असलेली सेवा प्राप्त करण्यासाठी सार्वजनिक अधिकाऱ्याला केले जाते. सुविधेसाठी पेमेंट असू शकते असे तुम्हाला वाटत असलेल्या अतिरिक्त पेमेंटसाठी तुम्हाला कधीही विचारले जाते, तेव्हा तुम्ही अनुपालन किंवा विधी विभागाशी पेमेंट करण्यापूर्वी संपर्क साधला पाहिजे. तुम्ही योग्य प्रकारे तयारी केल्याची आणि जिथे व्हिसाची आवश्यकता आहे अशा स्थानाकडे प्रवास करत असताना तुम्हाला सर्व आवश्यकता माहीत असल्याची खात्री करा.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी अलिकडेच कंपनी जॉईन केली आणि स्थानिक पद्धतींची माहिती करून घेत असताना, माझ्या सुपरवायझरने सांगितले की तिने सार्वजनिक अधिकाऱ्याच्या पुतण्याला नोकरी देऊ केली आहे कारण त्याने स्थानिक परवान्याच्या प्रलंबित समस्येला सोडवण्यासाठी मदत केली आहे. हे योग्य आहे असे मला वाटत नाही, पण मी अद्याप कंपनीमध्ये नवीन असल्याने त्यामध्ये हस्तक्षेप करू इच्छित नाही. यामध्ये मी काही करू शकतो का?

**उत्तर:**
सुपरवायझरची वर्तणूक बेकायदेशीर आहे आणि ती आपल्या कंपनीच्या लौकिकाला जोखमीमध्ये टाकू शकते. तुम्ही तत्काळ अनुपालन विभागाच्या सदस्याशी तुमच्या निरीक्षणाबद्दल बोलले पाहिजे.

# 3

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
व्यावसायिक प्रवासावर असताना, मला स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांद्वारे अडवण्यात आले. मला खात्री होती की मी वेगात नव्हतो, तरी मी वेगाने जात होतो असा त्याने दावा केला. तो म्हणाला की मी त्याला रोख रक्कम दिल्यास, तो मला जाऊ देईल आणि ते त्याने धमकीच्या हावभावामध्ये केल्याने हे स्पष्ट केले की माझ्याकडे खरोखर पर्याय नाही. मी जर त्याला पेमेंट केले नाहीतर मला दुखापत होण्याची भीती वाटते. मी का करावे?

**उत्तर:**
आरोग्याला धोका, सुरक्षितता किंवा शारीरिक क्षेमकुशल यांना धोका होऊ शकण्याच्या आपातकालीन परिस्थितींमध्ये पेमेंट करण्याची अनुमती आहे. तुमच्या सुपरवायझरला आणि अनुपालनाला तत्काळ प्रसंगाचा अहवाल द्या.

# भेटी आणि मनोरंजन

**भेटी, मनोरंजन आणि अन्य अनुदाने ही अनेक संस्कृतींचा आणि - एका विशिष्ट मूल्यापर्यंत – सर्वसामान्य व्यवसाय पद्धतीचा भाग आणि कौतुकाचे प्रतीक आहे. परंतु त्याला मर्यादा आहेत. आम्ही व्यावसायिक वर्तणुकीमध्ये नेहमी आपला निष्पक्षपातीपणा राखतो.**

**भेटी आणि आमंत्रणे ही मूल्यामध्ये नेहमी वाजवी आणि करण्यात येणाऱ्या व्यवसायाशी संबंधित असली पाहिजेत. भेटी देणे आणि मनोरंजन हे वारंवार देखील असता कामा नये.**



**भेटी आणि आमंत्रणे ही एखाद्या स्वतंत्र निर्णय-प्रक्रियेवर अनुचितपणे प्रभाव पाडण्याच्या हेतूने असता कामा नये, त्यामुळे दायित्वाची भावना तयार होता कामा नये किंवा त्यांनी Clariant च्या हिताला हानी पोहचवता कामा नये. अशा भेटी आणि आमंत्रणे प्रतिबंधित आहेत.**

**अशा स्थिती असू शकतात जिथे Clariant ची धोरणे आपल्याला भेट स्वीकारण्याला प्रतिबंध करतात, मात्र जिथे स्थानिक सांस्कृतिक प्रथा भेट नाकारणे हा अपमान मानतात.. कायदेशीर असल्यास, आपण भेट स्वीकारू शकतो तथापि ही भेट Clariant साठी प्राप्त झाली आणि आपल्या व्यक्तिगत फायद्यासाठी नाही हे दात्याला कळवले पाहिजे. कृपया अनुपालन विभागाच्या सदस्याशी  त्या वस्तूच्या पुढील वापराबद्दल तत्काळ सल्लामसलत करा.**

## भेट

पारदर्शी पद्धतीने, मैत्रीचे किंवा आदराचे चिन्ह म्हणून देऊ केलेल्या वस्तू, सेवा किंवा कौतुकाचे अन्य टोकन. त्या विचारात घेण्याच्या किंवा मूल्य परत मिळण्याच्या अपेक्षेशिवाय स्पष्टपणे देण्यात येतात. परस्पर संबंधांची वृद्धी करण्यासाठी किंवा देणाऱ्या कंपनीच्या ब्रॅण्डच्या प्रसारासाठी देण्यात येणाऱ्या भेटीवर प्रसाराच्या वस्तूंवर लोगो किंवा संदेश यांना सामील करून वापरल्या जातात.

## मनोरंजन

यामध्ये मनोरंजन, भोजन, स्वागत, मनोरंजनाची, सामाजिक किंवा क्रीडा कार्यक्रमाची तिकीटे, क्रीडा कार्यक्रमामध्ये सहभागी होणे, व्यावसायिक लोकांमध्ये संबंध आरंभ करण्यास किंवा विकसित करण्यासाठी दिल्या किंवा प्राप्त केल्या जातात अशा कृतींचा समावेश होतो. आदरातिथ्याला देऊ करणारा किंवा त्याचा प्रतिनिधी हजर नसल्यास आणि यजमान म्हणून भूमिका करत असल्यास, अशा मनोरंजनाला भेट म्हणून मानण्यात यावे. जोडीदार किंवा अन्य कुटुंब सदस्य यांना Clariant यांच्याशी संबंधित कोणत्याही व्यावसायिक संदर्भातील मनोरंजनातून वगळण्यात येईल आणि संबंधित आमंत्रणांला नाकारण्यात आले पाहिजे.

**→ धोरणे**
भेटी आणि आमंत्रणे स्वीकारण्याबाबत धोरण

**→ हे देखील पाहा**
स्वारस्याचे संघर्ष

भेटी आणि मनोरंजने जी देण्यात आली किंवा प्राप्त झाली ती नेहमी

–
वाजवी किंमतीची असली पाहिजेत;

–
वारंवार नसली पाहिजेत;

–
वाजवी व्यावसायिक उद्देशाची पूर्ती करणारी असली पाहिजेत;

–
स्वीकारण्याजोग्या व्यावसायिक पद्धतींशी अनुरूप असली पाहिजेत आणि फक्त प्राप्त करणाऱ्याची नीतिमत्ता संहिता त्यासाठी अनुमती देत असल्यासच देऊ केली गेली पाहिजेत;

–
अभिरुचीपूर्ण आणि सांस्कृतिक दृष्ट्या स्वीकारार्ह.

भेटी आणि मनोरंजन टाळण्यात किंवा नाकारण्यात आले पाहिजे, जर ते

–
Clariant ची प्रतिमा मलीन करत किंवा अवघडलेपण आणत असल्यास;

–
प्रौढ करमणूक म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकत असल्यास;

–
उधळपट्टी किंवा इतरांकडून उधळपट्टी म्हणून समजले जाऊ शकत असल्यास;

–
रोख किंवा रोख समतुल्य जसे की गिफ्ट कार्ड, चेक कर्ज, स्टॉक किंवा जास्त आर्थिक किंवा प्रकारचा लाभ असलेली वस्तू असल्यास;

–
विनंतीनुसार प्रदान केली जात असल्यास;

–
गुप्तपणे दिली जात असल्यास;

–
काम किंवा सार्वजनिक कर्तव्यांच्या कामगिरीवर प्रभाव पाडण्यासाठी डिझाइन केलेले किंवा समजले जात असल्यास;

–
व्यवसाय निर्णयांच्या वेळेबरोबरीने घडून येत असल्यास, ज्यायोगे व्यवसायाच्या निर्णयावर अयोग्यरित्या प्रभाव पाडण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते;

# राजकीय कृती

**एक जबाबदार कॉर्पोरेट प्रबंधक म्हणून, Clariant संबंधित धोरण क्षेत्रांमधील राजकारणी, प्राधिकरणे. व्यावसायिक संघटना, तसेच अ-शासकीय संस्था यांच्याशी खुला, पारदर्शक संवाद असण्याची खात्री करण्याचे ध्येय राखते.**

**कोणतीही राजकीय योगदाने, ज्यामध्ये राजकीय पक्षांना किंवा संबंधित संघटना यांना Clariant च्या वतीने वित्तीय योगदाने करणे, त्याचप्रमाणे वैयक्तिक राजकीय कृतीसाठी कामाचा वेळ किंवा अन्य कंपनी मालमत्ता यांचा वापर करणे यांच्या समावेशासह, प्रतिबंधित आहेत. कर्मचाऱ्यांना धोरणकर्ते आणि प्राधिकारी यांच्याशी Clariant साठी संबंध प्रस्थापित करणे किंवा लॉबींग करणे यामध्ये आपली धोरणे, खास करून लाचलुचपत विरोधी आणि भ्रष्टाचार धोरण यांच्या पूर्ण पालनासह गुंतण्याची अनुमती आहे.**

## राजकीय कृती

राजकीय कृती ही एका धोरण-निर्मात्याबरोबर, धोरण निर्मितीशी संबंधित असलेल्या भागधारकांशी सार्वजनिक धोरण संवादामधील धोरणाच्या विकासामध्ये योगदान देण्याच्या उद्देशाने केलेली कोणतीही आंतरक्रिया किंवा अन्य गुंतणे आहे.

**→ हे देखील पहा**
धर्मादाय योगदाने, प्रायोजकत्व आणि कॉर्पोरेट नागरिकत्व कृती
स्वारस्याचे संघर्ष

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
गेली अनेक वर्षे मी एका स्थानिक उदारमतवादी पक्षाचा सदस्य आहे. आता मी Clariant ला जॉईन झालो आहे, माझा सहभाग पुढे सुरु ठेवण्यासाठी मला कंपनीच्या परवानगीची गरज आहे का?

**उत्तर:**
नाही, तुम्हाला परवानगीची गरज नाही. Clariant कर्मचाऱ्यांच्या राजकीय कृतींमध्ये व्यक्तिगत सहभागाला प्रतिबंधित करत नाही जोपर्यंत त्या कामाच्या तासाच्या वेळेच्या बाहेर असतात, त्या एक खाजगी गुंतणे म्हणून राहतात आणि तुमच्या काम करण्याच्या क्षमतेवर नकारात्मक प्रभाव पाडत नाहीत किंवा त्याच्याशी संघर्ष करत नाहीत. शंका असल्यास, पारदर्शक राहून आपल्या व्यवस्थापकाला आणि / किंवा HR विभागाला नेहमी अशा कृतींबद्दल लिखित स्वरुपात सूचित करावे असा सल्ला आहे.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी एक केंद्र व्यवस्थापक आहे आणि एका कारखाना बांधकामासाठी माझ्या स्थानिक पर्यावरण संरक्षण एजन्सीशी नियमित आंतरक्रिया असतात. ती राजकीय कृती आहे का?

**उत्तर:**
एक केंद्र व्यवस्थापक म्हणून, जसे आवश्यक असेल तसे स्थानिकरित्या निवडून आलेल्या अधिकाऱ्यासह गुंतणे हा तुमच्या कामाचा भाग आहे. या परिस्थितीमध्ये, कोणतेही गुंतणे हे संबंधित प्रादेशिक मुख्य आणि प्रादेशिक/ कॉर्पोरेट सस्टेनेबिलिटी ॲण्ड रेग्युलेटरी अफेअर्स (ESHA) यांच्यासह सुसंगत असण्याची गरज आहे.

# 3

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मला बांधल्या जाणाऱ्या केंद्रातील नवीन तंत्रज्ञानाच्या कल्पनेचा प्रसार करण्यास आणि त्याबद्दल शिक्षित करण्यास विस्तृत प्रमाणातील राजकारण्यांसह गुंतण्याची गरज आहे. मला लॉबी करणाऱ्यासोबत गुंतण्याची अनुमती आहे का?

**उत्तर:**
जेव्हा तुम्ही तृतीय-पक्ष (जसे की एक सल्लागार किंवा लॉबी करणारी फर्म) यांना गुंतवण्याचा निर्णय घेता आणि Clariant च्या वतीने – ज्यामध्ये लॉबींग कृती किंवा धोरण-कर्त्यांसह संपर्क करण्याची मोहीम आहे - वाटप करता किंवा आदेश देता, तेव्हा तुम्हाला नीतिमत्ता आणि जोखीम व्यवस्थापन समिती (ERMC) यांच्याकडून कोणत्याही संबंधामध्ये प्रवेश करण्यापूर्वी पूर्व परवानगी घेण्याची गरज आहे. याचे पुनरावलोकन हे ग्रुप इनोव्हेशन ॲण्ड सस्टेनेबिलिटी (GIS) ॲण्ड कम्प्लायन्स.

# आम्हाला आमच्या समाजाबद्दल काळजी आहे आणि आम्ही एक चांगले कॉर्पोरेट नागरिक म्हणून वागतो

**Clariant मध्ये आमचा प्रभाव आमच्या स्वत:च्या प्रचालनांच्या (ऑपरेशन्सच्या) पलिकडे जातो याची आम्हाला जाणीव आहे आणि निर्णय घेताना आम्ही ते विचारात घेतो. आम्ही कार्यरत आहोत त्या समाजामध्ये आम्ही आदरयुक्त संबंध राखतो. आमच्या संपूर्ण मूल्य श्रृंखलेदरम्यान लोकांवरील, ग्रहावरील (पृथ्वीवरील) आमचा प्रभाव आणि कामगिरी सुधारण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.**

या विभागामध्ये:

–

मानव हक्कांचा आदर करणे

–

धर्मादाय योगदाने, प्रायोजकत्व आणि कॉर्पोरेट नागरिकत्व कृती

–

स्वारस्याचे संघर्ष

# मानव हक्कांचा आदर करणे

**Clariant येथे, आम्ही Clariant च्या संपूर्ण प्रचालन प्रक्रिया, पुरवठा श्रृंखला आणि आपल्या समाजामध्ये हाती घेतलेल्या प्रकल्पांमध्ये मानवी हक्कांचे संरक्षण, आदर आणि प्रसार करतो.**

**पुढे जाऊन, आम्ही आंतरराष्ट्रीयरित्या मान्यता असलेल्या मानवी हक्क मानकांना जसे व्यवसाय आणि मानवी हक्क यावरील संयुक्त राष्ट्रसंघाची मार्गदर्शक तत्वे, अधिकारांचा आंतरराष्ट्रीय कायदा. मानवी हक्कांची वैश्विक घोषणा, संयुक्त राष्ट्रसंघाचे जागतिक ठराव, आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटना यांची चार मूलभूत तत्वे (सं. कामगार हक्क) यांना स्विकारतो आणि त्यांचे पालन करतो.**

**→ हे देखील पहा**
लोकांशी वागणूक
कामगाराच्या हक्कांचा आदर करणे

# धर्मादाय योगदाने, प्रायोजकत्व आणि कॉर्पोरेट नागरिकत्व कृती

**Clariant ला एक सन्माननीय कॉर्पोरेट नागरिक बनण्याची आणि ती कार्यरत असलेल्या समाजामध्ये सकारात्मक प्रभाव पाडण्याची इच्छा आहे.**

**कर्मचाऱ्यांना ऐच्छिक आधारावर त्यांच्या स्थानिक समाजामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. Clariant कंपनीच्या संसाधनांचा स्वयंसेवी आणि अन्य संबंधित कृतींच्या माध्यमातून स्थानिकरित्या योगदान देण्यासाठी वापर करण्यास समर्थन देते.**



**आम्ही Clariant च्या वतीने किंवा Clariant च्या संसाधनांसह आयोजित केलेल्या सामाजिक कृती या आमच्या धोरणांनुसार योग्य प्रकारे आयोजित केल्या जातील आणि Clariant मधील योग्य स्तरावरील प्राधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेण्यात येतील याची खात्री करतो. यामध्ये आवश्यक तिथे अनुपालन विभागाद्वारे पुनरावलोकन यांचा समावेश आहे.**

## धर्मादाय देणग्या

धर्मादाय देणगी ही ऐच्छिक तृतीय-पक्ष योगदान असते, जी चांगल्या भावनेने केलेली असते उदा. Clariant ला त्याबदली स्पष्टपणे काहीही प्राप्त होत नाही किंवा द्यावे लागत नाही. धर्मादाय देणगी ही वित्त योगदानाच्या स्वरूपात, एक प्रकारची देणगी (उदा. Clariant च्या उत्पादनांचे मोफत नमुने देणे), किंवा कामगाराच्या कामाच्या तासांचे ऐच्छिक योगदान या प्रकारे केली जाऊ शकतात. त्याच्या बदल्यात Clariant मागणी करत नसताना किंवा कंपनीला मूल्य नसलेले किंवा अतिशय कमी मूल्याचे काही देऊ केले जात असल्यास अशा योगदानालाही धर्मादाय देणगी म्हणून समजले जाते.

## प्रायोजकत्वे

प्रायोजकत्वे ही Clariant ची किंवा तिच्या ब्रॅण्डची जाहिरात करण्याच्या संधीच्या बदल्यात तृतीय-पक्षाद्वारे आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी पैशाच्या किंवा वस्तूंच्या स्वरूपात दिलेली Clariant ची कोणतीही योगदाने आहेत. अशा कृतीमध्ये Clariant चा लोगो प्रदर्शित केला जाणे, कार्यक्रमाच्या उद्घाटन किंवा समारोपाच्या वेळी, किंवा चर्चेच्या पॅनेलमध्ये वक्त्याच्या सहभागात त्याच प्रमाणे संबंधित कार्यक्रमाच्या तिकिटामध्ये Clariant चा संदर्भ हे असू शकते.

**→ हे देखील पहा**
लाचलुचपत आणि भ्रष्टाचार



# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी एका स्थानिक धर्मादाय संस्थेचा सदस्य आहे. आम्ही निधी गोळा करण्यासाठी एका कार्यक्रमाची योजना करत आहोत. मी Clariant च्या पुरवठादाराशी माझ्या Clariant च्या लेटरहेडचा वापर करून धर्मादाय देणगीसह योगदान देण्यासाठी आमंत्रित करण्यास संपर्क साधावा का, असा मी विचार करत आहे. मी ते करू शकतो का?

**उत्तर:**
नाही. तुम्ही खाजगी कृतीसाठी Clariant चे नाव वापरू शकणार नाही कारण त्यामुळे स्वारस्याच्या संघर्षाचा प्रभाव – अगदी जरी ते धर्मादाय कारणासाठी असेल तरी देखील- पडू शकतो. तुम्हाला जिथे Clariant कडील योगदानाने मूल्यवर्धन होऊ शकते अशी धर्मादाय संस्था माहीत असेल, तर तुम्ही स्वतःला कॉर्पोरेट नागरिकत्व व्यवस्थापन धोरणामध्ये वर्णन केलेल्या प्रक्रियेबद्दल स्वतःला ज्ञात करा आणि कोणत्याही प्रश्नासह तुमच्या रिजनल सस्टेनेबिलिटी ॲण्ड रेग्युलेटरी अफेअर्स मॅनेजरकडे संपर्क करा.

# स्वारस्याचे संघर्ष

**Clariant येथे, आम्ही उद्योजकता विचारसरणीला प्रोत्साहन देतो. आपल्यापैकी प्रत्येकजण नेहमीच कंपनीच्या सर्वोत्तम हिताची कृती करतो. याचा आपल्याला सर्वोत्तम परिणाम साध्य करण्यात आणि आपल्या भागधारकांमध्ये आदर वाढविण्यात उपयोग होऊ शकतो.**

**त्यामुळे, जी आपल्या व्यक्तिगत स्वारस्याचा Clariant च्या आणि तिच्या व्यवसायाच्या सर्वोत्तम हितात कृती करण्याच्या आपल्या क्षमतेवर प्रभाव पडेल किंवा तसे दिसते अशा कोणत्याही परिस्थितीला टाळण्याची आम्ही खात्री करू. कोणत्याही प्रकरणामध्ये, आम्ही स्वारस्याच्या संघर्षांना किंवा वैयक्तिक स्वारस्याच्या संघर्षांना प्रकट करतो, म्हणून त्यांना सोडवले जाऊ शकते.**

## स्वारस्याचा संघर्ष

स्वारस्याचा संघर्ष ही अशी परिस्थिती असते ज्यामध्ये कर्मचाऱ्याचे वैयक्तिक स्वारस्य हे Clariant च्या स्वारस्यांशी संघर्ष करते. यामध्ये पुढील निर्देशक परिस्थितींचा समावेश असू शकतो, मात्र तो तेवढ्या पुरताच मर्यादित नाही.

- व्यावसायिक भागीदारासह कौटुंबिक किंवा व्यक्तिगत स्वारस्ये जिथे कर्मचारी किंवा कर्मचाऱ्याचे कुटुंब Clariant च्या ग्राहक किंवा अन्य व्यावसायिक भागीदारांशी असलेल्या व्यावसायिक संबंधांपासून फायदे मिळवते किंवा वैयक्तिक फायदे मागते.
- अन्य संस्थामध्ये आर्थिक स्वारस्ये जिथे कर्मचाऱ्याची व्यक्तिगत गुंतवणूक कर्मचाऱ्याला Clariant शी स्पर्धेमध्ये टाकते किंवा टाकू शकते.
- कंपनीच्या आतील खाजगी व्यक्तिगत संबंध जे कार्यस्थळाच्या ठिकाणी अडथळा बनतात किंवा जिथे गुंतलेल्या व्यक्ती समान रिपोर्टिंग लाइनमध्ये किंवा जिथे एखादा निर्णय घेण्याचा प्राधिकार असतो किंवा इतरांवर प्रभाव पाडता येतो तिथे काम करते.
- Clariant च्या बाहेरील नोकरी जिचा Clariant च्या ग्राहकांसह किंवा अन्य व्यावसायिक भागिदारांसह असलेल्या व्यावसायिक संबंधावर नकारात्मक रितीने प्रभाव पडतो किंवा कामाची वेळ आणि अन्य कोणतीही Clariant मालमत्ता बाह्य व्यावसायिक कृती करण्यासाठी वापरली गेली आहे.
- इतर कंपन्यांच्या आत मंडळाच्या नियुक्त्या;
- Clariant च्या नोकरीपासून प्राप्त केलेल्या ज्ञान आणि माहितीसह व्यक्तिगत फायदा किंवा लाभ मिळवण्यासाठी व्यावसायिक संधी.

**→ हे देखील पहा**
लाचलुचपत आणि भ्रष्टाचार
लबाडी:

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
आम्ही एका नवीन पुरवठादाराला शोधत आहोत आणि माझ्या एका चांगल्या मित्राच्या मालकीचा व्यवसाय आहे जो मला वाटते की आम्हाला ज्याची गरज आहे त्यासाठी अतिशय योग्य आहे. मला जाणीव आहे की माझ्या मैत्रीमुळे तिथे संभाव्य स्वारस्याच्या संघर्ष होऊ शकतो, मात्र बोली लावण्याच्या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या कंपनीचा आपण विचार करणार नाही असा याचा अर्थ आहे का?

**उत्तर:**
नाही, याचा अर्थ असा नाही की तुमच्या मित्राच्या कंपनीला बोली लावण्याच्या प्रक्रियेतून वगळण्यात येईल. स्वारस्याचा संघर्ष आल्यास, तुम्ही तुमच्या सुपरवायझरला आणि अनुपालनामधील कोणालाही सूचित केले पाहिजे ज्यामुळे परिस्थितीचे मूल्यमापन केले जाईल, आणि उचित उपाययोजना करण्यात येईल. तुम्ही तुमच्या मित्राच्या फर्मला बोलीदार म्हणून प्रस्तावित करु शकता मात्र कोणत्याही प्रकारच्या स्वारस्याच्या संघर्षाच्या किंवा मानीव स्वारस्याच्या संघर्षाच्या संभाव्यतेला वगळण्यासाठी तुम्ही निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतून बाहेर पडले पाहिजे.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
आम्ही एका नवीन पर्यटन एजन्सीसाठी निविदा मागविल्या आहेत आणि आलेल्या कोटेशनमध्ये एक पर्यटन एजन्सी तिच्या स्पर्धात्मक बोलीमुळे सर्वात वर आहे. Clariant कडून त्यांच्यासोबतच्या बैठकीमध्ये, जर, त्यांनी प्रस्ताव जिंकल्यास त्याच्या बदल्यात,. त्यांनी मला आणि माझ्या कुटुंबियांना आमच्या पुढील सुट्टीसाठी 50% सवलत देऊ केली आहे  कोणत्याही मार्गे आपण या एजन्सीची निवड करण्याची शक्यता अधिक आहे, त्यामुळे मी ही ऑफर स्विकारल्यास काही फरक पडणार नाही – बरोबर?

**उत्तर:**
नाही, हे बरोबर नाही. अगदी जरी एजन्सी Clariant साठी सर्वोत्तम योग्य असल्याचे सिद्ध झाले तरी देखील, कंपनीच्या बाहेरील कोणाचीही, यामुळे अशी समजूत होईल की तुम्ही, वैयक्तिक फायदा मिळवण्यासाठी, या ऑफरमुळे वस्तुनिष्ठ निर्णय घेणे प्रभावित होण्याला अनुमती दिली. हो तुम्हाला आणि Clariant ला भ्रष्टाचारी असल्याचे भासवू शकते आणि त्यामुळे आपल्या लौकिकाला गंभीरपणे हानी पोहचवू शकते. तुमच्याकडे काम करण्यासाठी पर्यायी पर्यटन संस्था असेल ,तर तुम्ही या ऑफराला नाकारले पाहिजे आणि तत्काळ तुमच्या सुपरवायझरला आणि अनुपाल विभागातील कोणालाही अहवाल दिला पाहिजे.

# आम्ही माहिती काळजीपूर्वक हाताळतो

**Clariant** येथे, माहिती संरक्षित करण्याच्या आणि उचित प्रकारे हाताळण्याच्या महत्वाला आम्ही जाणून आहोत. आमच्या आर्थिक विवरणपत्रांमध्ये अचूक आणि सत्य माहिती प्रतिबिंबित होते. आपल्यापैकी प्रत्येकजण हा आम्ही माहिती अचूकपणे आणि सत्यपणाने आणि लागू असलेले सर्व कायदे आणि मानके, त्याचप्रमाणे अंतर्गत धोरणे आणि कार्यपद्धती यांच्याशी सुसंगत राखत असण्याची खात्री करण्यास जबाबदार आहे.

या विभागामध्ये:

–

माहिती सुरक्षितता

–

डेटा गोपनीयता

–

अचूक पुस्तके आणि नोंदी

# माहिती सुरक्षितता

Clariant साठी, माहिती अतिशय मूल्यवान आहे. त्यामुळे आम्ही माहितीकडे एक मालमत्ता म्हणून पाहतो, जिचा सच्चेपणा, गोपनीयता आणि उपलब्धता यांच्या संदर्भामध्ये संरक्षित करण्याची गरज आहे. त्याशिवाय, आमचे भागधारक, कर्मचारी आणि ग्राहक यांच्याबद्दल कोणतीही माहिती आम्ही संग्रहित करतो तिच्या सुरक्षिततेचे बंधन आमच्यावर आहे.

एक नियम म्हणून, आम्ही कंपनी माहिती फक्त मंजूर कंपनी उद्देशांसाठी वापरली पाहिजे. आम्ही आमच्या अंतर्गत धोरणांनुसार माहितीचे वर्गीकरण करतो आणि आम्ही कोणतीही माहिती ती “सार्वजनिक” म्हणून वर्गीकृत केली असल्याशिवाय किंवा प्राधिकृत व्यक्तीद्वारे मंजूर केलेली असल्याशिवाय कंपनीच्या बाहेर वापरत नाही.

तिच्या संवदेनशीलतेमुळे, आम्ही गोपनीय माहितीला अतिरिक्त काळजी आणि संरक्षण लागू करू. आम्हाला अशा माहितीमध्ये फक्त ज्यांना ती मिळण्याची स्पष्टपणे परवानगी देण्यात आलेली आहे आणि ज्यांना काम करण्यासाठी ती गरजेची आहे फक्त त्यांनाच प्रवेश करता येईल याची आम्ही खात्री केली पाहिजे. याचा असा अर्थ देखील आहे की आम्ही कोणतीही गोपनीय माहिती आमच्या कौटुंबिक सदस्यांना किंवा त्याच घरात राहणाऱ्या अन्य व्यक्तींना, आमच्या मित्रांना किंवा न गुंतलेल्या सहकाऱ्यांना प्रकट करता कामा नये.

## गोपनीय माहिती

गोपनीय माहितीमध्ये, Clariant च्या व्यावसायिक कृती, तंत्रज्ञान, बौद्धिक संपदा, आर्थिक स्थिती आणि कर्मचारी, त्याचप्रमाणे Clariant चे ग्राहक, पुरवठादार आणि व्यावसायिक भागीदार यांबाबत माहितीचा समावेश आहे, मात्र तेवढयापुरतीच मर्यादा नाही. Clariant च्या बौद्धिक संपदेमध्ये फक्त व्यापार गुपिते, पेटंट, व्यापारचिन्हे आणि कॉपीराईट यांचाच समावेश नाही, तर व्यवसाय, विपणन आणि सेवा योजना, तसेच तांत्रिक ज्ञान यांचाही समावेश आहे.

**→ हे देखील पहा**
इनसायडर ट्रेडिंग
बौद्धिक संपदा
(निकोप स्पर्धा
माध्यम संबंध आणि गुंतवणूकदार संबंध



# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
कामासाठी प्रवास करत असताना, मला ट्रेनमध्ये माझ्या मागील काही सीटवरील फोनचे संभाषण ऐकू आले. एक महिला Clariant बद्दल बोलत होती असे वाटले आणि, एका ठिकाणी, ती Clariant च्या भविष्यातील व्यूहनीतीबद्दलची गोपनीय माहिती प्रकट करत होती असे मी ऐकले. यामुळे मी बैचेन झालो. मी यामध्ये हस्तक्षेप करावा का?

**उत्तर:**
होय, परिस्थितीनुसार शक्य असल्यास, तुम्ही नम्रपणे तिला अडवले पाहिजे आणि तिला सांगितले पाहिजे की इतरजण सुद्धा हे ऐकू शकतात आणि तिला सार्वजनिक ठिकाणी व्यावसायिक माहिती शेअर करण्यापासून दूर राहण्यास सांगितले पाहिजे. काहीही असले तरी, तुम्ही या प्रसंगाला अनुपालन विभागातील कोणाला तरी सूचित केले पाहिजे. Clariant च्या व्यावसायिक व्यूहनीतीबद्दलची माहिती ही व्यापार गुपित म्हणून पात्र होते आणि त्यामुळेच तिला कठोरपणे गोपनीय ठेवणे आवश्यक आहे.

# डेटा खाजगीयता - माहितीची गोपनीयता




व्यक्तिगत डेटाची खाजगीयता (माहितीची गोपनीयता) आणि संरक्षण हा मूलभूत हक्क आहे. Clariant येथे, आमच्या कर्मचाऱ्यांचा, ग्राहकांचा,विक्रेत्यांचा आणि अन्य भागधारकांचा वैयक्तिक डेटा, खास करून वेगाने विकसित होणाऱ्या परस्परांतील संवादाच्या आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वातावरणात संरक्षित करणे हे एक अत्यंत महत्वाचे प्राधान्य आहे..

आम्ही खाजगी गोष्टी खाजगी ठेवतो. आम्ही फक्त ज्या कायदेशीर उद्देशाला साध्य करण्यासाठी तो आरंभी प्राप्त केला आहे त्यासाठी आवश्यक किमान प्रमाणात व्यक्तिगत डेटा (माहिती) संकलित करतो, वापरतो, प्रकट करतो आणि संग्रहित करतो.

आम्ही व्यक्तिगत डेटा (माहिती) त्याच्या प्रक्रियेच्या उद्देशासाठी जोपर्यंत राखणे आवश्यक आहे तोपर्यंतच राखतो आणि आम्ही प्रक्रिया करतो त्या कोणत्याही व्यक्तिगत डेटाला (माहितीला) कमाल संरक्षण लागू करतो.

आम्ही जेथे व्यक्तिगत माहिती संकलित करतो, संग्रहित करतो आणि वापरतो त्या सर्व न्यायाधिकारक्षेत्रांमध्ये लागू असलेल्या सर्व कायदे आणि नियमनांचे पालन करतो. आम्ही एखाद्या डेटा खाजगीयता (माहिती गोपनीयता) घटनेचा भाग किंवा साक्षीदार असल्यास, आम्ही तिचा समूह खाजगीयता, HR किंवा विधी विभागाला तत्काळ अहवाल देतो.

## व्यक्तिगत डेटा (माहिती)

व्यक्तिगत डेटा (माहिती) म्हणजे एखाद्या ओळखलेल्या किंवा ओळखण्याजोग्या व्यक्तीशी संबंधित कोणतीही माहिती.

→ **हे देखील पहा**
लोकांशी वागणूक
सामाजिक माध्यमे
इलेक्ट्रॉनिक संसाधने

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मला माझ्या कार्यसंघाच्या बाहेरील वरिष्ठ व्यवस्थापकाद्वारे Clariant च्या कर्मचाऱ्यांशी संबंधित व्यक्तिगत डेटाच्या श्रृंखलेचा समावेश असलेला तपशीलवार अहवाल त्यांना प्रदान करण्यास सांगितले. कोणत्या कारणासाठी त्यांना या डेटाची (माहितीची)  गरज आहे याची मला खात्री नाही. मी स्पष्टीकरण मागावे का?

**उत्तर:**
होय. तुम्हाला व्यक्तिगत डेटामध्ये प्रवेश असल्यास, त्याच्या बेकायदेशीर वापराच्या विरोधात त्याला संरक्षित करण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. आमच्या धोरणांनुसार, व्यक्तिगत डेटा (माहिती) प्रक्रियेसाठी कायदेशीर उद्देश असणे आवश्यक आहे. विनंतीकर्ता कोणताही उद्देश प्रदान करत नसल्यास, किंवा तुम्हाला कायदेशीर उद्देश दिला आहे की नाही याची खात्री नसल्यास, समूह खाजगीयतेकडून सल्ला मिळवा.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी नवीन संघ सदस्याच्या भरतीमध्ये गुंतलेला आहे आणि या प्रक्रियेत जे सहकारी गुंतलेले आहेत त्याच्यांशी प्राधान्याच्या उमेदवारांची सूची मी शेअर केली. नंतर मला असे निर्दशनास आले की. अनवधानाने, मी माझ्या ई-मेल मधील वितरणाच्या सूचीत बाह्य पुरवठादाराला सामील केले होते. मी काय केले पाहिजे?

**उत्तर:**
तुम्ही तत्काळ पुरवठादाराला लिहिले पाहिजे आणि त्यांना सूचित केले पाहिजे की ते तो ई-मेल प्राप्त करण्यास उद्देशित नाहीत. कृपया त्यांना ई-मेल हटवण्यास आणि माहिती गोपनीय ठेवण्यास सांगा. याशिवाय, तुम्ही या घटनेची माहिती समूह खाजगीयतेला दिली पाहिजे.

# अचूक पुस्तके आणि नोंदी

**Clariant च्या नोंदी या पूर्ण, सत्य, बरोबर, समयोचित, अचूक आणि स्पष्ट असणे आवश्यक आहे.**

**नियतकालिक आर्थिक विवरणपत्रे आणि संबंधित आर्थिक अहवाल देणे आणि संप्रेषण (परस्परांतील संवाद) यांसाठी परिणामकारक प्रक्रिया आणि अंतर्गत नियंत्रणे आखलेली आहेत याची खात्री करणे, त्याचप्रमाणे प्रकटन आवश्यकतांच्या अधीन बाबींचे प्रकाशन ही आमची जबाबदारी आहे.**

**यामध्ये आर्थिक अहवाल देण्याची तत्वे यासारख्या स्थानिक कायदेशीर विनियामकांच्या, त्याचप्रमाणे IFRS (आंतरराष्ट्रीय आर्थिक अहवाल मानके), जी Clariant चा आर्थिक अहवाल देणे यासाठीचा आधार आहेत, यांसारख्यांच्या अनुपालनाचा समावेश आहे. समूहाच्या स्वतःच्या अंतर्गत बुककीपींग प्रक्रिया पाळणे देखील आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये आपले अहवाल देणे हे फसवणारे असता कामा नये- मग ते Clariant च्या आतमध्ये किंवा बाह्यरितीने देण्याच्या ध्येयाने असले तरी देखील.**

**→ हे देखील पहा**
लबाडी
लाचलुचपत आणि भ्रष्टाचार
माहिती सुरक्षितता
इनसायडर ट्रेडिंग

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
वर्ष अखेरीच्या शेवटी अंदाजपत्रकातील शिल्लक रक्कमेचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी, मी विचार करत होतो की मी आमच्या सल्लागारांना पुढील वर्षाच्या सेवांपैकी काहींचे तत्काळ बील द्यावे असे विचारावे का?

**उत्तर:**
Clariant ची पुस्तके आणि नोंदी या उपार्जन तत्वानुसार ठेवली जातात, ज्यामध्ये व्यवहार हे जेव्हा ते होतात त्यावेळी ते ओळखले जाणे आवश्यक असते. त्यामुळे, आपण त्या दिल्या जातात त्याहून वेगळ्या कालावधीतील सेवांसाठी हिशोब करू शकत नाही.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
माझे सुपरवायझर तत्काळ पे करण्याची गरज असल्याचे सांगत एक देयक घेऊन माझ्याकडे पोहोचले. त्याने मला खरेदी ऑर्डर प्रक्रियेला मागे टाकण्यास आणि वित्त मधील सहकाऱ्यांना हा त्याच्याकडून थेट विशेष आदेश असल्याचे सांगण्यास सांगितले. मी त्याच्या सूचनेचे अनुसरण करावे का?

**उत्तर:**
Clariant च्या पेमेंट कार्यपद्धती प्रत्येकाला समानपणे लागू होतात. अगदी तत्काळ प्रकरणांमध्ये देखील, सुपरवायझरद्वारे “विशेष आदेशाने” देयके बुक करता येत नाहीत. सामान्यपणे, खरेदी ऑर्डर दिलेली असणे आवश्यक आहे. तुमचा सुपरवायझर या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करण्यावर भर देत असल्यास, तुम्ही आवाज उठवला पाहिजे आणि खरेदी, वित्त किंवा अनुपालन विभाग यांच्याशी सल्लामसलत केली पाहिजे.

# 3

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
एक पुरवठादार ई-मेल करून त्याच्या थकित देयकाबद्दल मला सूचित करत माझ्यापर्यंत पोहोचला. पेमेंटसाठी वापरण्याचे अद्ययावत बँक तपशीलही त्यांनी माझ्याशी शेअर केले. बँक तपशीलातील बदलांना कसे व्यवस्थापित करावे याची मला माहिती नाही. मी काय केले पाहिजे?

**उत्तर:**
तुम्ही वित्तमधील कोणाशी तरी कोणत्याही पार्श्वभूमी तपासण्या आवश्यक आहे व त्याचे मूल्यमापन करण्यासाठी संपर्क साधला पाहिजे. आमच्या प्रणालीमधील लाभार्थी बँक खात्यातील बदल Clariant च्या पुस्तकांमध्ये अचूक प्रतिबिंबित होण्यासाठी आणि लबाडी करण्याच्या प्रयत्नांचा धोका कमी करण्यासाठी कठोर अंतर्गत कार्यपद्धतींचे अनुसरण करतात.

# आम्ही ज़बाबदारीने संप्रेषण करतो, परस्परांशी संवाद साधतो.

संप्रेषण (परस्परांतील संवाद) अत्यावश्यक आहे. एक जागतिक स्तरावरील नियोक्ता आणि सार्वजनिकरित्या ट्रेड होणारी कंपनी म्हणून, आम्हाला आमच्या संप्रेषणाचे (परस्परांतील संवादाचे) महत्व माहीत आहे. आम्ही वस्तुस्थितीवर आधारित, समयोचित, लागू असलेले कायदे आणि नियमने आणि आमच्या स्वत:च्या अंतर्गत मार्गदर्शक तत्वांना अनुसरून आमच्या भागधारकांशी संप्रेषण सुसंवाद करतो.

या विभागामध्ये:

–


सामाजिक माध्यमे

–

माध्यम संबंध आणि गुंतवणूकदार संबंध

# सामाजिक माध्यमे

**सामाजिक माध्यमे अंतर्गत त्याच प्रमाणे बाह्य भागीदारांसह संप्रेषणाला (परस्परांतील संवादाला) समर्थन देण्याची आणि सहकार्य करण्याची संधी देऊ करतात. Clariant सामाजिक माध्यमांच्या सक्रिय वापराला समर्थन देतो, खास करून अशा कृती Clariant च्या मूल्यामध्ये वाढ करतात तेव्हा.**



**आम्ही व्यक्तिगतरित्या सामाजिक माध्यमांवर सक्रिय असतो आणि Clariant बद्दल बोलत असतो, तेव्हा आम्ही कंपनीच्या लौकिकाबद्दल जागरूक राहणे गरजेचे असते. त्यामुळे, आम्ही सामाजिक माध्यमांवर कोणतीही गोपनीय किंवा अंतर्गत माहिती प्रकट करत नाही आणि आम्ही स्पष्ट करतो की आम्ही कंपनीचे प्रवक्ते नाही.**

**आम्ही नम्र आहोत आणि कोणालाही छळत नाही. Clariant आमचा मालक आहे असे सूचिबद्ध केलेले असताना आपल्या खाजगी खात्यावर चिखावणीखोर किंवा विवादास्पद संभाषणांमध्ये गुंतलेले असण्याच्या परिणामी शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते.**

**आम्ही Clariant संबंधी चालू असलेली समस्या, सार्वजनिक वादविवाद, किंवा अरिष्ट यांसंबंधी, समूह संप्रेषणे, विधी, HR किंवा आमचा स्थानिक HR व्यवस्थापक यांच्याकडे तपासणी केल्याशिवाय सामग्री किंवा वैयक्तिक मत पोस्ट करत नाही, कारण ते एक अधिकृत Clariant निवेदन आहे असा त्याचा अर्थ वाचक लावू शकतात.**

**→ हे देखील पहा**
माहिती सुरक्षितता
इनसायडर ट्रेडिंग
इलेक्ट्रॉनिक संसाधने

**आपणा सर्वांना Clariant च्या सामाजिक माध्यमे मूलभूत नियमांची जाणीव असणे आवश्यक आहे:**

–
**विनम्र असा,** लोकांना छळू नका किंवा त्याचे मन दुखावू नका – जे काही ऑनलाईन जाते ते कायम स्वरुपी ऑनलाइन राहते;

–
**गोपनीय किंवा अंतर्गत माहिती प्रकट करू नका;**

–
**स्वत: साठी बोला,** हे स्पष्ट करा की आपण कंपनीचे प्रवक्ते नाही;

–
**ग्राहक, गुंतवणूकदार किंवा माध्यमांच्या प्रश्नांना उत्तर देऊ नका,** Clariant चे तज्ञ त्याची काळजी घेतात;

–
**ब्रँडची सुरक्षा करा,** तुमच्या वैयक्तिक फीड किंवा सामग्रीवर Clariant ब्रँडिंग किंवा लोगो वापरू नका;

–
**कॉपीराईटचे उल्लंघन करू नका,**खात्री करा की तुम्ही जे काही पोस्ट करता त्याचे हक्क तुमच्याकडे आहेत किंवा प्रत्येकाचे क्रेडिट देता;

**सामाजिक माध्यमावरील उचित गुंतण्याचे स्वागत आहे. काहीतरी सार्वजनिक शेअर केले जात असताना गुंतण्यास मुक्त असा, उदाहरणार्थ, एखादया उत्पादनाबद्दल सार्वजनिक माहिती किंवा संघ बैठक.**

**या नियमांचे पालन करताना, तुम्ही नेहमीच तुमच्या पोस्टमध्ये Clariant च्या खात्याला (@Clariant) टॅग करू शकता किंवा हॅशटॅग #Clariant जोडू शकता. आम्ही तुम्हाला आपल्या अधिकृत कंपनी खात्याद्वारे पोस्ट केलेल्या सामग्रीला रिट्विट करण्यास, शेअर करण्यास आणि टिप्पणी देण्यासही प्रोत्साहित करतो.**

# माध्यम संबंध आणि गुंतवणूकदार संबंध

कायदेशीर आणि व्यावसायिक दायित्वांचे पालन करतानाच **Clariant** बाह्य भागीदारांसह एका खुल्या आणि पारदर्शक परस्परांतील संवादाचा पाठपुरावा करते.

आम्ही एक-आवाज-धोरणानुसार संप्रेषण करतो आणि सार्वजनिक नसलेली माहिती सार्वजनिक नसलेलीच राहील याची खात्री करतो. त्यामुळे, हे महत्वाचे आहे की फक्त नियुक्त करण्यात आलेले प्रवक्ते हे कंपनीच्या वतीने माध्यमांना किंवा वित्तीय बाजारपेठांना निवेदने प्रदान करतील. प्रवक्ते हे एकतर समूह संप्रेषणे किंवा गुंतवणूकदार संबंध यांच्याद्वारे प्राधिकृत केले जातात.

आम्हाला माध्यमांकडून काही विचारणा प्राप्त झाल्यास, आम्ही त्यांना पुढील हाताळणीसाठी समूह संप्रेषण विभागाकडे अग्रेषित करतो. वित्तीय समुदायांकडून आलेल्या विचारणांना फक्त गुंतवणूकदार संबंध विभागाद्वारे उत्तरे दिली जाऊ शकतात.

## वित्तीय समुदाय

कोणतीही व्यक्ती /व्यक्ती आणि संस्था ज्या वित्तीय बाजारपेठेमध्ये व्यवसाय करतात.

## मालकीची आणि उपार्जित माध्यमे

मालकीचे माध्यम, ज्याची सामग्री ही Clariant च्या नियंत्रणाखाली असते, उदा. Clariant.com, आमचे इन्ट्रानेट आणि आमची स्वतःची सामाजिक माध्यम चॅनेल्स. उपार्जित माध्यम हे स्वतंत्र माध्यम असते आणि त्यांच्या संपादकीय सामग्रीवर Clariant चा थेट प्रभाव नसतो.

**→ हे देखील पहा**
भेटी व मनोरंजन
माहिती सुरक्षितता
इनसायडर ट्रेडिंग
सामाजिक माध्यमे

# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी माझ्या एका मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीमध्ये आहे जिथे तिच्या पुतण्याशी, जो स्थानिक पत्रकार बनणार आहे, मी संभाषण केले. आम्ही कामाबद्दल बोलत होतो, तेव्हा त्याने मला Clariant च्या भविष्यातील व्यूहनीतीबद्दल विचारले. हा एक खाजगी कार्यक्रम असल्याने, मी गृहित धरले की मी माझ्या मित्राच्या पुतण्यावर विश्वास ठेवू शकतो, म्हणून मी काही बोध त्याला देऊ शकतो, बरोबर?

**उत्तर:**
नाही, तुम्ही कोणतीही अंतर्गत आणि संभाव्यतः संवेदनशील माहिती कंपनीच्या बाहेरील कोणालाही, खास करून पत्रकारांना शेअर करता कामा नये. त्याला सांगा की तुम्हाला कोणत्याही प्रकारची माहिती शेअर करण्याची अनुमती नाही आणि त्याला Clariant माध्यम संबंधाशी संपर्क साधण्यास सांगा.

# 2

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
एका ऑनलाईन मासिकाच्या पत्रकाराने मला ई-मेल वर Clariant बद्दल एक अतिशय सकारात्मक लेख पाठवला, ज्यामध्ये असे म्हटले होते की जर मी, त्याच्या बदल्यामध्ये, त्यांच्या मासिकासह Clariant साठी काही जाहिराती खरेदी केल्यास त्यांच्या पुढील आवृत्तीपैकी एकामध्ये त्याला हा लेख प्रकाशित करावयाचा आहे. मी सहमत व्हावे का?

**उत्तर:**
हा लेख फक्त परतावा सेवेच्या आधारावर प्रकाशित केला जाऊ शकत असल्यास, याला एक पेड सार्वजनिक संबंध समजले जाते. Clariant स्वतःला कधीही पेड सार्वजनिक संबंधामध्ये गुंतवत नाही. त्यामुळे, तुम्ही पत्रकाराला प्रत्युतर न देता तो ई-मेल Clariant माध्यम संबंध यांच्याकडे अग्रेषित केला पाहिजे.

# आम्ही आमच्या संसाधनांची काळजी घेतो

**आम्ही Clariant च्या मालमत्तांना त्या आपल्या स्वत:च्या असल्याप्रमाणे वागवतो आणि आम्ही त्यांच्या वापराबाबतच्या कंपनीच्या नियमांचा आदर करतो. Clariant ची बौद्धिक संपदा ही नाविन्यपूर्ण स्पर्धात्मक किनार आहे  आहे जी कंपनीला कामगिरी करण्यासाठी आणि आणखी विकास करण्यासाठी गरजेची आहे हे आम्हाला माहीत आहे आणि, त्यामुळेच, आम्ही तिला सर्वाधिक संरक्षण प्रदान करतो.**

**या विभागामध्ये:**

–

**व्यासायिक मालमत्ता**

–

**इलेक्ट्रॉनिक संसाधने**

–

**बौद्धिक संपदा**

# व्यावसायिक मालमत्ता

**आपल्यापैकी प्रत्येकाचे Clariant च्या व्यावसायिक मालमत्तांची काळजी घेणे हे कर्तव्य आहे. आम्ही त्यांना गहाळ होणे, हानी होणे, गैरवापर होणे, चोरी होणे, दुर्विनियोग किंवा विनाश होण्यापासून संरक्षित करू. व्यावसायिक मालमत्ता, त्या नीतिमत्ता संहिता किंवा विशिष्ट धोरणामध्ये आणखी निर्देशित केलेल्या नसल्यास, फक्त व्यावसायिक उद्देशांसाठीच वापरल्या जाव्यात..**

**आम्ही Clariant च्या उपकरणांमध्ये, यंत्रसामुग्रीमध्ये, अन्य तांत्रिक स्थापना आणि सुविधांमध्ये त्याचप्रमाणे वाहनामध्ये उचित आणि पारदर्शी पद्धतीने आणि Clariant च्या सर्वोत्तम हितानुसार गुंतवणूक करतो, प्रचालन करतो आणि विल्हेवाट लावतो. आम्ही Clariant च्या पैशाचे व्यवस्थापन आणि खर्च हा शहाणपणाने, आणि काटकसरीने, तो स्वतःचा आहे अशा प्रकारे, करतो.**

**→ हे देखील पाहा**
माहिती सुरक्षितता

## 1

### शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
मी एक कर्मचारी आहे आणि मला कंपनीची कार माझ्या खाजगी वापरासाठी खरेदी करणे आवडेल. हे ठीक आहे का?

**उत्तर:**
कंपनी मालमत्तेच्या सर्व विक्रीला स्थानिक धोरणे, पारदर्शक प्रक्रिया, सर्व कर्मचाऱ्यांना समान उपलब्धता आणि उचित मूल्य बाजार किंमत या मूलभूत नियमांचा आदर करत, लागू होतील. अनेक कर्मचारी मालमत्तेला खरेदी करण्यास इच्छुक असल्यास, स्थानिक व्यवस्थापन खुल्या आणि स्पष्ट निवड प्रक्रियेचे पालन होत असल्याची खात्री करेल.

## 2

### शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
Clariant तिची जुनी उपकरणे विकत आहे. माझा एक माजी सहकारी माझ्याकडे आला आणि त्याने मला विचारले की मी त्याच्यावर एक उपकार करू शकतो का कारण त्याला एक जुने उपकरण लाभदायी किंमतीला खरेदी करणे आवडेल. हे ठीक आहे का?

**उत्तर:**
जेव्हा तुम्हाला असे प्रस्ताव प्राप्त होतील तेव्हा अशा प्रस्तावांबद्दल तुमच्या लाइन व्यवस्थापकाला किंवा विधी विभागाला सूचित करा. तुम्हाला एका निपटारा प्रक्रियेचे अनुसरण करावे लागेल जी खात्री करेल की त्याला Clariant च्या सर्वोत्तम हितानुसार सर्वोच्च संभाव्य किंमत मिळेल.

# इलेक्ट्रॉनिक संसाधने

**Clariant ची इलेक्ट्रॉनिक संसाधने ही Clariant व्यवसायासाठी आहेत. यामध्ये संगणक, नोटबुक्स, कार्यालयीन आणि मोबाईल फोन, टॅब्लेट्स, सॉफ्टवेअर, प्रणाली, नेटवर्क्स आणि सर्व पेरिफेरल उपकरणे यांचा समावेश आहे.**

**आम्ही Clariant च्या इलेक्ट्रॉनिक संसाधनाचा वापर जबाबदारीने, कायदेशीर रीतीने आणि नीतिमत्तापूर्वक करतो आणि ती स्वत:ची असल्याप्रमाणे त्यांची काळजी घेतो. आम्ही Clariant च्या इलेक्ट्रॉानिक संसाधनांना अनधिकृत वापरापासून आणि सुरक्षितता धोक्यांपासून संरक्षित करतो. याचा अर्थ आम्ही बेकायदेशीर साईटना भेट देत नाही, संशयास्पद दस्ताऐवजांना उघडत नाही, खाजगी उद्देशांसाठी परवाना करारानाम्याने संरक्षित केलेल्या कोणत्याही Clariant सॉफ्टवेअरला कॉपी करत नाही, किंवा कार्यस्थळी खाजगी सॉफ्टवेअर स्थापित करत नाही. पुढे जाऊन, आम्ही Clariant च्या इलेक्ट्रॉनिक संसाधनांना बाह्य व्यावसायिक उपक्रम किंवा वैयक्तिक आर्थिक लाभासाठी वापरत नाही.**

**वंशवादी किंवा पोर्नोग्राफिक स्वरूपाच्या किंवा हिंसेचे समर्थन करण्याचा माहितीला शोधणे, डाउनलोड करणे किंवा अग्रेषित करणे हे खासकरून दुरूपयोग समजले जाईल, ते कठोरपणे प्रतिबंधित आहे, आणि काही न्यायाधिकारक्षेत्रांमध्ये गुन्हेगारी कृती म्हणून समजले जाऊ शकते.**

**→ हे देखील पहा**
माहिती सुरक्षितता
इनसायडर ट्रेडिंग
छळवणूक

# बौद्धिक संपदा

Clariant ची नावीन्यपूर्णता हा आपल्या कंपनीच्या यशाचा गाभा आहे आणि ते अनेक वर्षांचे श्रम आणि लक्षणीय गुंतवणूक यांचा परिणाम असतात. एक नावीन्यपूर्णतेने परिचालित कंपनी म्हणून, बौद्धिक संपदा हक्क या महत्त्वपूर्ण मालमत्ता आहेत ज्या आपल्या व्यवसायाला सुरक्षित आणि इतरांपासून वेगळ्या करतात.

आमच्या बौद्धिक संपदेला सर्वाधिक आणि शक्य असलेले सर्वोत्तम संरक्षण आम्ही प्रदान करतो कारण ती आम्हाला यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली स्पर्धात्मक किनार आहे. आम्ही आमच्या बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघनांच्या विरोधात संरक्षण करतो आणि आम्ही तृतीय-पक्षाच्या वैध बौद्धिक संपदा हक्कांचा आदर करतो.



## बौद्धिक संपदा

बौद्धिक संपदा हक्कांमध्ये, खास करून, पेटंट, व्यापारचिन्हे आणि नो-हाउ यांचा समावेश आहे. आमच्या उत्पादनांची आणि सेवांची त्याचप्रमाणे आमच्या कॉर्पोरेट ब्रॅण्ड्सची नावे व्यापारचिन्हे म्हणून अनेक देशांमध्ये नोंदणीकृत आहेत आणि आमच्या पोर्टफोलिओला वैशिष्ट्यपूर्ण ठरवतात. तांत्रिक नावीन्यपूर्णतेला पेटंटच्या मार्गे सुरक्षित केले जाऊ शकते. पेटंट हे राष्ट्रीय पेटंट कार्यालयाद्वारे मंजूर आणि नोंदणी केलेली असतात आणि पेटंट केलेल्या शोधाला तयार करण्यापासून, वापर करण्यापासून किंवा विक्री करण्यापासून इतरांना वगळण्याचा हक्क त्याच्या मालकाला प्रदान करतात. संशोधन आणि विकास (R&D) आणि प्रचालन (ऑपरेशन्स) यामध्ये तज्ज्ञता आणि कौशल्ये प्राप्त करताना, विकसित करताना आणि लागू करताना, आम्ही नो-हाउ उत्पन्न करतो ज्याला गुप्त ठेवणे आवश्यक असते आणि ते बाजारामध्ये आमच्या कामगिरीला आणि स्पर्धात्मकतेला ठरवणारा घटक आहे.

**→ हे देखील पहा**
माहिती सुरक्षितता
इनसायडर ट्रेडिंग



# 1

## शिकण्याचे साधन

**प्रश्न:**
माझ्या नोकरीमध्ये, मला Clariant च्या बौद्धिक संपदा हक्कांबाबत काही करावे लागत नाही. ते समूह बौद्धिक संपदा व्यवस्थापन, समूह तंत्रज्ञान व नावीन्यपूर्णता, आणि व्यावसायिक संशोधन कार्यासाठी अधिक महत्वाची आहेत आणि त्यांचा माझ्यावर परिणाम होत नाही - बरोबर?

**उत्तर:**
हे बरोबर नाही. Clariant सारख्या नावीन्यपूर्णता-चालित कंपनीसाठी, बौद्धिक संपदा ही आमच्या व्यवसायाला सुरक्षित आणि प्रतिष्ठित ठेवण्यासाठी आवश्यक असलेली महत्त्वाची मालमत्ता आहे. त्यामुळे, त्यांचा प्रत्येकावर प्रभाव पडतो. तुम्हाला आमच्या बौद्धिक संपदा हक्कांच्या संभाव्य उल्लंघनाची जाणीव झाल्यास किंवा तुम्ही Clariant साठी संभाव्यतः मौल्यवान असे काही तरी शोधलेले आहे असे तुम्हाला वाटत असल्यास, त्याबद्दल बोलून तुम्ही संस्थेला पाठबळ देऊ शकता. याशिवाय, Clariant च्या ज्ञानाला कठोरपणे गोपनीय राखण्याला विसरू नका.

**CLARIANT INTERNATIONAL LTD**
Rothausstrasse 61 – 4132 Muttenz – स्विट्झर्लंड
© Clariant International Ltd, 2020

CLARIANT
ETHICS &
INTEGRITY